RNI No. MAHBIL/2009/35529

# महाराष्ट्र शासन राजपत्र

# भाग एक-कोकण विभागीय पुरवणी

वर्ष ६, अंक २८]     गुरुवार ते बुधवार, सप्टेंबर १७-२३, २०२०/भाद्र २६-आश्विन १, शके १९४२ [पृष्ठे २८, किंमत : रुपये १४.००

## प्राधिकृत प्रकाशन

### शासकीय अधिसूचना, नेमणुका इत्यादी

### अधिसूचना

**प्रमुख जिल्हा न्यायाधीश, रायगड-अलिबाग यांजकडून**

### अधिसूचना

क्रमांक रा. अ./३५५५/२०२०.— श्री. प्र. ग. लंबे, दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, श्रीवर्धन, यांची दिनांक ५ ऑगस्ट २०२० ते दिनांक ७ ऑगस्ट २०२० अशी ३ दिवसांची अर्जित रजा, पुढील दिनांक ८ ऑगस्ट २०२० व दिनांक ९ ऑगस्ट २०२० रोजी सुट्टीला जोडून, दिनांक ४ ऑगस्ट २०२० रोजीच्या कार्यालयीन वेळेनंतरपासून ते दिनांक १० ऑगस्ट २०२० रोजीच्या कार्यालयीन वेळेपूर्वीपर्यंत मुख्यालय सोडण्याच्या परवानगीसह तसेच कोविड-१९ निर्देशांचे पालन करण्याचे अटींवर अर्ज मंजूर करण्यात येतो. सुचित करण्यात येते दिनांक १० ऑगस्ट २०२० ते १९ ऑगस्ट २०२० रोजीपावेतो गृहविलगीकरणात Work from Home करून दिनांक २० ऑगस्ट २०२० ला कर्तव्यावर रुजू व्हावे.

पर्यायी व्यवस्थेची आवश्यकता नाही.

श्री. प्र. ग. लंबे, यांचा रजेचा कालावधी संपल्यानंतर त्यांची दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, श्रीवर्धन येथे पुर्नियुक्ती करण्यात येत आहे.

महाराष्ट्र नागरी सेवा नियम, १९८१ मधील नियम ३९ नुसार प्रमाणित करणेत येत आहे की, श्री. प्र. ग. लंबे, हे जर उपरोक्त कालावधीत रजेवर गेले नसते तर दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, श्रीवर्धन या पदावर स्थानापन्न म्हणून काम करीत राहिले असते.

श्री. प्र. ग. लंबे, हे रजेवर जाण्यापूर्वी जे वेतन आहरित करीत आहेत त्याच दराने वेतन काढणेत यावे.

उपरोक्त कालावधीत त्यांचे न्यायालयाचा कार्यभार श्रीमती. ए. सी. रोकडे, दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, माणगाव यांजकडे राहील.

**वि. प्र. इंगळे,**
प्रमुख जिल्हा न्यायाधीश,
रायगड–अलिबाग.

अलिबाग,
दिनांक ४ ऑगस्ट २०२०.

**प्रमुख जिल्हा न्यायाधीश, रायगड-अलिबाग यांजकडून**

**अधिसूचना**

क्रमांक रा. अ./३४५१/२०२०.— श्री. व्ही. आर. डोईफोडे, दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, महाड, यांची दिनांक १७ जुलै २०२० ते १८ जुलै २०२० अशी एकूण २ दिवसांची परावर्तीत रजा मंजुर करणेत येत आहे.

पर्यायी व्यवस्थेची आवश्यकता नाही.

श्री. व्ही. आर. डोईफोडे, यांचा रजेचा कालावधी संपल्यानंतर त्यांची दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, महाड म्हणून पुर्ननियुक्ती करण्यात येत आहे.

महाराष्ट्र नागरी सेवा नियम, १९८१ मधील नियम ३९ नुसार प्रमाणित करणेत येत आहे की, श्री. व्ही. आर. डोईफोडे, हे अधिकारी जर उपरोक्त कालावधीत रजेवर गेले नसते तर दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, महाड या पदावर स्थानापन्न म्हणून काम करीत राहिले असते.

श्री. व्ही. आर. डोईफोडे, हे अधिकारी रजेवर जाण्यापूर्वी जे वेतन आहरित करीत आहेत त्याच दराने वेतन काढणेत यावे.

उपरोक्त कालावधीत त्यांचे न्यायालयाचा कार्यभार श्रीमती. व्ही. आर. कुलकर्णी, सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, माणगांव यांजकडे राहील.

**विभा. प्र. इंगळे,**
प्रमुख जिल्हा न्यायाधीश,
रायगड–अलिबाग.

अलिबाग,
दिनांक २३ जुलै २०२०.

---

**प्रमुख जिल्हा न्यायाधीश, रायगड-अलिबाग यांजकडून**

**अधिसूचना**

क्रमांक रा. अ./३४२८/२०२०.— श्री. व्ही. आर. डोईफोडे, दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, महाड, यांची दिनांक १० जून २०२० ते २४ जून २०२० अशी एकूण १५ दिवसांची अर्जित रजा, मुख्यालय सोडण्याच्या परवानगीसह मंजुर करणेत येत आहे.

पर्यायी व्यवस्थेची आवश्यकता नाही.

श्री. व्ही. आर. डोईफोडे, यांचा रजेचा कालावधी संपल्यानंतर त्यांची दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, महाड म्हणून पुर्ननियुक्ती करण्यात येत आहे.

महाराष्ट्र नागरी सेवा नियम, १९८१ मधील नियम ३९ नुसार प्रमाणित करणेत येत आहे की, श्री. व्ही. आर. डोईफोडे, हे अधिकारी जर उपरोक्त कालावधीत रजेवर गेले नसते तर दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, महाड या पदावर स्थानापन्न म्हणून काम करीत राहिले असते.

श्री. व्ही. आर. डोईफोडे, हे अधिकारी रजेवर जाण्यापूर्वी जे वेतन आहरित करीत आहेत त्याच दराने वेतन काढणेत यावे.

उपरोक्त कालावधीत त्यांचे न्यायालयाचा कार्यभार श्रीमती. व्ही. आर. कुलकर्णी, सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, माणगांव यांजकडे राहील.

**विभा. प्र. इंगळे,**
प्रमुख जिल्हा न्यायाधीश,
रायगड–अलिबाग.

अलिबाग,
दिनांक २१ जुलै २०२०.

## प्रमुख जिल्हा न्यायाधीश, रायगड-अलिबाग यांजकडून

### अधिसूचना

क्रमांक रा. अ./३३८७/२०२०.— श्री. ए. एस. सोनवलकर, ६ वे सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, पनवेल, यांचा दिनांक २१ जुलै २०२० ते २३ जुलै २०२० अशी ३ दिवसांची परिवर्तीत रजा, दिनांक १७ जुलै २०२० रोजीचे कार्यालयीन वेळेनंतरपासून ते दिनांक २७ जुलै २०२० रोजीच्या कार्यालयीन वेळेपूर्वीपर्यंत मुख्यालय सोडण्याच्या परवानगीसह तसेच वैद्यकीय प्रमाणपत्र दाखल करण्याचे अटींवर परिवर्तीत रजा मंजूर करणेत येत आहे.

पर्यायी व्यवस्थेची आवश्यकता नाही.

श्री. ए. एस. सोनवलकर, यांचा रजेचा कालावधी संपल्यानंतर त्यांची ६ वे सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, पनवेल म्हणून पुर्ननियुक्ती करण्यात येत आहे.

महाराष्ट्र नागरी सेवा नियम, १९८१ मधील नियम ३९ नुसार प्रमाणित करणेत येत आहे की, श्री. ए. एस. सोनवलकर, हे अधिकारी जर उपरोक्त कालावधीत रजेवर गेले नसते तर ६ वे सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, पनवेल या पदावर स्थानापन्न म्हणून काम करीत राहिले असते.

श्री. ए. एस. सोनवलकर, हे अधिकारी रजेवर जाण्यापूर्वी जे वेतन आहरित करीत आहेत त्याच दराने वेतन काढणेत यावे.

उपरोक्त कालावधीत त्यांचे न्यायालयाचा कार्यभार श्रीमती. एस. एस. पानसरे, ३ रे सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर व न्यायदंडाधिकारी वर्ग-१, पनवेल यांजकडे राहील.

**विभा प्र. इंगळे,**
प्रमुख जिल्हा न्यायाधीश,
रायगड–अलिबाग.

अलिबाग,
दिनांक १७ जुलै २०२०.

---

## प्रमुख जिल्हा न्यायाधीश, रायगड-अलिबाग यांजकडून

### अधिसूचना

क्रमांक रा. अ./३४२३/२०२०.— श्री. व्ही. आर. डोईफोडे, दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, महाड, यांची दिनांक २५ जून २०२० ते २७ जून २०२० अशी एकूण ३ दिवसांची परिवर्तीत रजा, मागील दिनांक १० जून २०२० ते दिनांक २४ जून २०२० रोजीच्या अर्जित रजेला जोडून मंजूर करणेत येत आहे.

पर्यायी व्यवस्थेची आवश्यकता नाही.

श्री. व्ही. आर. डोईफोडे, यांचा रजेचा कालावधी संपल्यानंतर त्यांची दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, महाड म्हणून पुर्ननियुक्ती करण्यात येत आहे.

महाराष्ट्र नागरी सेवा नियम, १९८१ मधील नियम ३९ नुसार प्रमाणित करणेत येत आहे की, श्री. व्ही. आर. डोईफोडे, हे अधिकारी जर उपरोक्त कालावधीत रजेवर गेले नसते तर दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, महाड या पदावर स्थानापन्न म्हणून काम करीत राहिले असते.

श्री. व्ही. आर. डोईफोडे, हे अधिकारी रजेवर जाण्यापूर्वी जे वेतन आहरित करीत आहेत त्याच दराने वेतन काढणेत यावे.

उपरोक्त कालावधीत त्यांचे न्यायालयाचा कार्यभार श्रीमती. व्ही. आर. कुलकर्णी, सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, माणगांव यांजकडे राहील.

**विभा प्र. इंगळे,**
प्रमुख जिल्हा न्यायाधीश,
रायगड–अलिबाग.

अलिबाग,
दिनांक २१ जुलै २०२०.

## THE COMMISSIONER OF POLICE, GREATER MUMBAI

### Order

(UNDER SECTION 144 OF CRIMINAL PROCEDURE CODE, 1973)

No. CP/XI(6)/2266/(06)/2020.—Whereas, it is likely that terrorists/anti-national elements might make use of drones, remote controlled micro-light aircrafts, aerial missile, para-gliders in their attacks and thereby endangering the life of public at large, destroy public property and cause disturbance to Law and Order in Brihanmumbai Police Commissionerate area ;

2. Whereas, it has become necessary that some checks should be put on the activities of terrorists/anti-national elements across the Brihanmumbai Police Commissionerate to prevent the attack through such drones, remote controlled micro-light aircrafts, aerial missiles, para-gliders, and immediate necessary action should be taken to prevent the same ;

3. Therefore, I, Shahaji Umap, Dy. Commissioner of Police (Operations), Brihanmumbai and Executive Magistrate, *vide* powers conferred upon me under section 144 of the Criminal Procedure Code, 1973 (Act II of 1974) do hereby order that no flying activities of drone, remote controlled micro-light aircrafts, aerial missiles, para-gliders, etc. shall be allowed in the jurisdiction of Brihanmumbai Police Commissionerate for the period of next 30 days i.e. from 28th August 2020 to 26th September 2020 except for aerial surveillance through such devices by Mumbai Police or by specific permission in writing by Dy. Commissioner of Police (Operation), Brihanmumbai.

4. This order shall remain in force with effect 00-01 hrs. of 28th August 2020 till 24-00 hrs. of 26th September 2020 unless withdrawn earlier.

5. Any person contravening this order shall be punishable under section 188 of the Indian Penal Code, 1860.

6. As the notice cannot be served individually to all concerned, the order is hereby passed ex-parte. It shall be published for the information of public, through press and by affixing copies on the Notice Boards of the Police Stations, Divisional ACsP, Zonal DCsP, Municipal Ward Offices and by affixing copies at Tahsil and Ward Offices.

Given under my hand and seal on the 24th day of the August, 2020.

SHAHAJI UMAP,
Dy. Commissioner of Police (Operations),
and Executive Magistrate,
Greater Mumbai.

## जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग यांजकडून

### " अंतिम अधिसूचना "

क्रमांक REV/मशा-५/अरुणा प्र. आ.-भो.-ना. महसुली गाव/१/२०१९.—ज्याअर्थी, अरुणा मध्यम पाटबंधारे प्रकल्पांतर्गत मौजे आखवणे, भोम, नागपवाडी, ता. वैभववाडी या गावातील काही भाग बुडीत क्षेत्रात गेले असून त्यांचे पुनर्वसन मौजे मांगवली, कुसुर, कुंभारवाडी, हेत, वेंगसर, ता. वैभववाडी येथे झाले आहे. त्यापैकी मौजे मांगवली, कुसुर व कुंभारवाडी येथे नवीन गावठाण तयार केले असून सदर गावठाणात मौजे आखवणे, भोम व नागपवाडी येथील पुनर्वसित लोकांचे पुनर्वसन करणेत आले आहे. सदर गावठाणास नवीन महसूल गावाचा दर्जा देऊन नवीन महसुली गावास "आखवणे-भोम-नागपवाडी (पुनर्वसन गावठाण)" असे नाव देणेबाबत मा. सरपंच, ग्रामपंचायत आखवणे-भोम यांनी ठरावानुसार विनंती केली आहे.

त्याअर्थी, तहसीलदार, वैभववाडी यांचेकडील पत्र क्र. जमाबंदी/म. गाव/आखवणे-भोम-नागपवाडी पुनर्वसन गावठाण/२०१९, दिनांक ६ डिसेंबर २०१९, उप विभागीय अधिकारी, कणकवली यांचेकडील पत्र क्र. प्रशासन/म. गाव/आख. भोम. नागप. पुर्न. गाव/१२/२०१९, दिनांक ९ डिसेंबर २०१९ व उप जिल्हाधिकारी (पुनर्वसन), सिंधुदुर्ग यांचेकडील पत्र क्र. डेस्क-१४/पुनर्वसन-३/म. गा. नि./२०१९, दिनांक १० डिसेंबर २०१९ अन्वये अरुणा मध्यम पाटबंधारे प्रकल्पांतर्गत मौजे आखवणे, भोम, नागपवाडी, ता. वैभववाडी या गावातील लोकांचे पुनर्वसन मौजे मांगवली, कुसुर व कुंभारवाडी येथे केले असून सदर गावठाणास नवीन महसुली गाव निर्माण करून त्यास "आखवणे-भोम-नागपवाडी (पुनर्वसन गावठाण)" असे नाव देणेबाबत शिफारस केली आहे. त्यानुसार या कार्यालयाकडील प्रारूप अधिसूचना क्र. REV/मशा-५/अरुणा प्र. आ.-भो.-ना. महसुली गाव/१/२०१९, दिनांक ११ डिसेंबर २०१९ अन्वये सिंधुदुर्ग जिल्ह्यातील वैभववाडी तालुक्यातील प्रारूप अधिसूचनेतील स्तंभ २ मधील गावांची विभागणी करून त्यांच्या सीमामध्ये बदल करुन "आखवणे-भोम-नागपवाडी (पुनर्वसन गावठाण)" हे नवीन महसुली गाव निर्माण करणेबाबत प्रारूप अधिसूचना प्रसिद्ध करणेत आली आहे. सदर अधिसूचनेबाबत दिनांक २६ डिसेंबर २०१९ पर्यंत जनतेकडून हरकती किंवा सूचना पुराव्यानिशी तहसीलदार, वैभववाडी व उप विभागीय अधिकारी, कणकवली यांचे कार्यालयाकडे मागविणेत आल्या होत्या. त्यानुसार प्राप्त झालेल्या हरकती व सूचनेबाबत तहसीलदार, वैभववाडी व उप विभागीय अधिकारी, कणकवली यांचेकडून अभिप्रायासह अहवाल या कार्यालयास प्राप्त झाला आहे. तसेच प्राप्त झालेल्या एकूण ४ हरकतीबाबत दिनांक ४ फेब्रुवारी २०२० रोजी हरकतदारांची सुनावणी घेणेत आलेली असून हरकती/सूचनेबाबत निर्णय घेणेत आला आहे. त्यानुसार "आखवणे-भोम-नागपवाडी (पुनर्वसन गावठाण)" या नवीन महसुली गाव निर्मितीची अंतिम अधिसूचना प्रसिद्ध करीत आहे.

ज्याअर्थी, शासकीय अधिसूचना महसूल व वनविभाग क्र. टीएलसी/१०७६/६३९२३/म-६, दिनांक १ जुलै १९७६ अन्वये महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ च्या कलम ४ पोट-कलम (१) खंड (पाच आणि सहा) च्या परंतुकाखाली राज्य शासनास असलेल्या ज्या शक्ती जिल्हाधिकारी यांना प्रदान करण्यात आलेल्या आहेत त्याचा वापर करून मी, श्रीम. के. मंजूलक्ष्मी, जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग याद्वारे सिंधुदुर्ग जिल्ह्यातील वैभववाडी तालुक्यातील खालील अनुसूचीतील स्तंभ (२) मधील गावांची विभागणी करून त्यांच्या सीमामध्ये बदल करीत आहे आणि असा निर्देश देत आहे की,—

(१) यापूर्वी स्तंभ क्र. (२) मधील गावांच्या क्षेत्रात असलेले भूमापन क्रमांक अनुसूचीतील स्तंभ क्र. (४) मध्ये विनिर्दिष्ट केलेप्रमाणे समाविष्ट असलेले स्थानिक क्षेत्र सिंधुदुर्ग जिल्ह्याच्या वैभववाडी तालुक्यातील अनुसूचीतील. स्तंभ क्र. (३) मध्ये विनिर्दिष्ट केलेले नवीन महसुली गाव होईल.

(२) उरलेले स्थानिक क्षेत्र सिंधुदुर्ग जिल्ह्याच्या वैभववाडी तालुक्यातील अनुसूचीतील स्तंभ क्र. (२) मध्ये विनिर्दिष्ट केलेले मुळ गावे होतील.

(३) सिंधुदुर्ग जिल्ह्याच्या वैभववाडी तालुक्यातील अनुसुचीतील स्तंभ (४) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या हद्दी असलेले भूमापन क्र./सर्व्हे नंबर सिंधुदुर्ग जिल्ह्याच्या वैभववाडी तालुक्यातील अनुसूचीतील स्तंभ क्र. (३) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या नावाने ओळखण्यात येणा-या महसुली गावात रुपांतर करीत आहे.

(४) तसेच नवीन निर्माण होणा-या गावाचा नकाशा यासोबत प्रसिद्ध करणेत येत आहे.

### " अनुसूची "

तालुका वैभववाडी, जिल्हा सिंधुदुर्ग

| अ. क्र. | गावाचे नाव (मूळ) | नवीन महसुली गावाचे नाव | भूमापन/स. नं. क्रमांक |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| (१) | मांगवली | आखवणे-भोम-नागपवाडी (पुनर्वसन गावठाण) | स. नं. ८६४, १४१४, १४१५, १४२३ ते १४३३, १४३६ ते १४४८, १४५०, १४५१, १४५३, १४५५ ते १४६५, १४६७, १४६९ ते १४७३, १४७५ ते १४७८, १४९६ ते १४९८, १५०० ते १५०७, १५१४, १५१७, २०६०, २०७४ ते २०८३, २०८५, २०८६ व २०८८ (एकूण क्षेत्र-४०.३७४ हे. आर) |

| (१) | (२) | | (३) |
|---|---|---|---|
| | मांगवली (मूळ गाव) | | स. नं. १ ते ८६३, ८६५ ते १४१३, १४१६ ते १४२२, १४३४, १४३५, १४४९, १४५२, १४५४, १४६६, १४६८, १४७४, १४७९ ते १४९५, १४९९, १५०८ ते १५१३, १५१५, १५१६, १५१८ ते २०५९, २०६१ ते २०७३, २०८४, २०८७, २०८९ ते २३२४. |
| (२) | कुंभारवाडी | आखवणे-भोम-नागपवाडी (पुनर्वसन गावठाण) | स. नं. ५७१, ५९२, ५९८ ते ६१० (एकूण क्षेत्र-१४.८७४ हे. आर) |
| | कुंभारवाडी (मूळ गाव) | | स. नं. १ ते ५७०, ५७२ ते ५९१, ५९३ ते ५९७, ६११ ते १०१७. |
| (३) | कुसूर | आखवणे-भोम-नागपवाडी (पुनर्वसन गावठाण) | स. नं. ७७१, ७७२, ८३९ ते ८५४, ८५७ ते ८६५ व ८७१ (एकूण क्षेत्र-२०.७७७ हे. आर) |
| | कुसूर (मूळ गाव) | | स. नं. १ ते ७७०, ७७३ ते ८३८, ८५६, ८६६ ते ८७०, ८७२ ते १५९३. |
| | आखवणे-भोम-नागपवाडी (पुनर्वसन गावठाण) या नवीन गावाचे एकूण क्षेत्र. | | **एकूण क्षेत्र-७६.०२.५० हे. आर** |

सिंधुदुर्गनगरी,
दिनांक १४ ऑगस्ट २०२०.

**के. मंजूलक्ष्मी,**
जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग.

---

**प्रमुख जिल्हा न्यायाधीश, रायगड-अलिबाग यांजकडून**

**अधिसूचना**

क्रमांक रा. अ./३२०९/२०२०.— श्री. एस. व्ही. स्वामी, सचिव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, रायगड-अलिबाग, यांची दिनांक ११ जून २०२० ते १७ जून २०२० अशी एकूण ७ दिवसांची उपभोगलेली अर्जित रजा, मागील दिनांक ५ जून २०२० ते दिनांक १० जून २०२० रोजीच्या अर्जित रजेला जोडून मुख्यालय सोडण्याच्या परवानगीसह मंजूर करण्यात येत आहे.

पर्यायी व्यवस्थेची आवश्यकता नाही.

श्री. एस. व्ही. स्वामी, यांचा रजेचा कालावधी संपल्यानंतर त्यांची सचिव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, रायगड-अलिबाग, येथे पुनर्नियुक्ती करण्यात येत आहे.

महाराष्ट्र नागरी सेवा नियम, १९८१ मधील नियम ३९ नुसार प्रमाणित करणेत येत आहे की, श्री. एस. व्ही. स्वामी, हे जर उपरोक्त कालावधीत रजेवर गेले नसते तर सचिव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, रायगड-अलिबाग, या पदावर स्थानापन्न म्हणून काम करीत राहिले असते.

श्री. एस. व्ही. स्वामी, हे रजेवर जाण्यापूर्वी जे वेतन आहरित करीत आहेत त्याच दराने वेतन काढणेत यावे.

उपरोक्त कालावधीतील त्यांचे न्यायालयाचा कार्यभार श्री. एल. जी. पाच्छे, दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, अलिबाग यांजकडे राहील.

**वि. प्र. इंगळे,**
प्रमुख जिल्हा न्यायाधीश,
रायगड–अलिबाग.

अलिबाग,
दिनांक ३० जून २०२०.

## जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांजकडून

### शुद्धीपत्रक

क्रमांक उपजिभूक्र-७/भूसं./एलएक्यू ८४३/मुंउजि/२०१८.—दिनांक १० जानेवारी २०१९ **महाराष्ट्र शासन असाधारण राजपत्र,** भाग-एक (को.वि.पु.) असाधारण क्रमांक ४ चे पृष्ठ क्र. १ ते ३ वर जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांचेकडून प्रसिद्ध झालेल्या, दिनांक ११ जानेवारी २०१९ च्या अधिसूचनेमध्ये संयुक्त मोजणीप्रमाणे क्षेत्राच्या तपशिलामध्ये केलेली दुरूस्ती खालीलप्रमाणे वाचावी :—

**गाव मालाड (पू.), तालुका बोरीवली, जिल्हा मुंबई उपनगर**

| **करीता** संपादन करावयाच्या जागेचे | | | | **वाचा** संपादन करावयाच्या जागेचे | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| अ.क्र. | न.भू.क्र. | स.क्र. | आवश्यक जमिनीचे अंदाजित क्षेत्र (चौ.मी.) | अ.क्र. | न.भू.क्र. | स.क्र. | आवश्यक जमिनीचे क्षेत्र (चौ.मी.) |
| (१) | (२) | (३) | (४) | (१) | (२) | (३) | (४) |
| १ | ८२७ पै. | २३९ पै. | १,५४,३१०.५० | १ | ८२७ अ | २३९ पै. | १,४२,८२३.८० |
| | **एकूण** | . . | **१,५४,३१०.५०** | | **एकूण** | . . | **१,४२,८२३.८०** |

**सार्वजनिक प्रयोजन.—** " पुनर्वसन व पुनर्स्थापन, २ महानगरपालिका शाळा व विकास नियोजन रस्तेकरीता " भूसंपादन.

मुंबई,
दिनांक २० ऑगस्ट २०२०.

**मिलिंद बोरीकर,**
जिल्हाधिकारी,
मुंबई उपनगर जिल्हा.

## BY THE COLLECTOR, MUMBAI SUBURBAN DISTRICT

*CORRIGENDUM*

No. DCLA-7/L.A./LAQ843/M.S.D./2018.— Dated 10th January 2019, The correction made in details of area as per Joint Measurement in the schedule appended to the Notification published on 11th January 2019, in *Maharashtra Government Extra Ordinary Gazaette* Part-One (K.D.S.) Extra Ordinary No. 4 on page. 1 to 3 by the Collector, Mumbai Suburban District should be read as follows.

*Schedule*

**Village : Malad (E.), Taluka : Borivali, District : Mumbai Sub.**

| FOR | | | | READ | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| Land Under Acquisition | | | | Land Under Acquisition | | | |
| Sr. No. | CTS No. | S.No. | Area of Required Land (Sq. Mtr.) | Sr. No. | C.T.S No. | S.No. | Area of Required Land (Sq. Mtr.) |
| (1) | (2) | (3) | (4) | (1) | (2) | (3) | (4) |
| 1 | 827 pt. | 239 pt. | 1,54,310.50 | 1 | 827 A | 239 pt. | 1,42,823.80 |
| | **Total** | . . | **1,54,310.50** | | **Total** | . . | **1,42,823.80** |

*Public Purpose.*— Acquisition for the purpose of “Rehabilitation and Resettlement, 2 Municipal Schools.”

Mumbai,
Dated 20th August 2020.

MILIND BORIKAR,
Collector,
Mumbai Suburban District.

## पोलीस उप आयुक्त (शहरे), वाहतुकस भायखळा, मुंबई यांजकडून

## तात्पुरती अधिसूचना

क्रमांक १०५५/पोउआ/शहरे/वाहतूक/२०२०.— वाहतुकीस अडथळा आणि गैरसोय टाळण्याकरीता आणि तसा निर्देश देण्याकरीता मी, सोमनाथ घार्गे, पोलीस उप आयुक्त (शहरे), वाहतूक, बृहन्मुंबई मोटार वाहन अधिनियम १९८८ हे कलम ११५ (१८८ चा ५९) व शासकीय अधिसूचना क्रमांक ०५८९/सीआर-१०६१/टीआरए-२, दिनांक १९ मे, १९९० या नुसार प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करून याद्वारे खालील प्रमाणे आदेश देत आहे.

**क्रमांक ४३/तात्पुरता/पोउआ/शहरे/वा/२०२०.**

अति पावसामुळे एन. एस. पाटकर, मार्ग (पेडर रोड) केम्स कॉर्नर ब्रिज जवळ, हँगिंग गार्डन, मलबार हिल या ठिकाणी भुस्खलन झाल्याने एन. एस. पाटकर, मार्गावरून (पेडर रोड) जाणा-या व येणा-या वाहतुकीला धोका निर्माण झाल्याने पुढील रस्ता वाहतुकीसाठी पुढील आदेशापर्यंत बंद करण्यात आलेला आहे. सदर रोडची वाहतुक बंद केल्याने बी. ए. रोड, सर जे. जे. रोड, ईब्राहिम रेहमतुल्ला रोड, मोहम्मद अली रोड, एल. टी. रोड, पी. डी. मेलो रोड या ठिकाणी वाहतुकीचे प्रमाण वाढलेले असुन वाहतुकीची कोंडी होत आहे.

पी. डी. मेलो रोडवरील वाहतुक मोठ्या प्रमाणात वाढल्याने वाहतुक सुरळीत चालण्यासाठी दिनांक १९ ऑगस्ट २०२० रोजी पासुन (१७-०० ते २१-००) पुढील आदेशापर्यंत वाडीबंदर जंक्शन व कुंदनलाल काटा येथुन उजवे वळण घेणेस निर्बंध करण्यात येत आहे. सदर कालावधील वाहतुक वळवणे हे वाहतुक सुव्यवस्थेत करण्याच्या दृष्टीने आवश्यक आहे. तरी खालील प्रमाणे वाहतूकीत बदल करण्यात येत आहे.

**वाहतुक बंद करण्यात आलेली ठिकाणे :—**

(१) पी. डी. मेलो रोड दक्षिण वाहीनीवरून वाडीबंदर जंक्शन येथुन उजवे वळण घेवून एस. व्हि. पी. रोड येथे जाणारी वाहतुक पुढील आदेशापर्यंत तात्पुरत्या स्वरूपात बंद करण्यात येत आहे.

(२) तसेच कुंदनलाल काटा दक्षिण वाहीनी वरून उजवे वळण घेवून वाय. एम. रोड येथे जाणारी वाहतुक पुढील आदेशापर्यंत तात्पुरत्या स्वरूपात बंद करण्यात येत आहे.

(३) एस. व्हि. पी. रोड येथुन वाजीबंदर जंक्शन येथे उजवे लळण घेवून कर्नाक बंदर येथे वाहतुक पुढील आदेशापर्यंत तात्पुरत्या स्वरूपात बंद करण्यात येत आहे.

**डोंगरी, भेंडीबाजार, चारनळ, जे. जे. जंक्शन येथे जाणेकरीता वाहतुक वळविण्याचे पर्यायी मार्ग :—**

(१) दक्षिण वाहीनी पी. डी. मेलो रोडवरून कर्नाक बंदर येथुन यु टर्न घेवून-पी. डी. मेलो मार्ग (उत्तर वाहीणी)-वाडीबंदर-जंक्शन डावे वळण घेवून-एस. व्ही. पी. रोड. चारनळ-डोंगरी जे. जे. जंक्शन भेंडी बाझार जंक्शन येथे जाऊ शकतील.

(२) त्याचप्रमाणे मायलेट बंदर जंक्शन येथुन उजवे वळण घेवून-काकळीज जंक्शन-भायखळा वाहतुक विभाग हद्दीतुन डॉकयार्ड जंक्शन- अब्बु बकर मुल्ला चौक-महाराणा प्रताप चौक-हरिभाऊ वाडगांवकर चौक-सेंट ॲन चर्च-नेसबीट जंक्शन मार्गे जे. जे. जंक्शन-भेंडी बाझार जंक्शन-चारनळ-नुरबाग-डोंगरी येथे जाऊ शकतील.

**वाय. एम. रोड येथे जाणेकरीता वाहतुक वळविण्याचे पर्यायी मार्ग :—**

(१) दक्षिण वाहीनी पी. डी. मेलो रोडवरून कर्नाक बंदर येथुन यु टर्न घेवून पी. डी. मेलो मार्ग (उत्तर वाहीणी)-कुंदनलाल काटा येथुन डावे वळण घेवून वाय. एम. रोड येथुन जाऊ शकतील.

**कर्नाक बंदर येथे जाणेकरीता वाहतुक वळविण्याचा पर्यायी मार्ग :—**

(१) एस. व्ही. पी. रोड वाडीबंदर जंक्शन येथुन कर्नाक बंदर येथे जाणा-या वाहनांना एस. व्ही. पी. रोड वाडीबंदर जंक्शन डावे वळण पी. डी. मेलो रोड (उत्तर वाहीनी)-मायलेट बंदर येथे यु टर्न-पी. डी. मेलो रोड (दक्षिण वाहीणी) ने कर्नाक बंदर येथे जाऊ शकतात.

तरी वाडीबंदर जंक्शन व कुंदनलाल काटा दक्षिण वाहीणीवरून उजवे वळण, एस. व्ही. पी. रोड वाडीबंदर जंक्शन येथुन उजवे वळण घेण्यास सायंकाळी १७-०० ते २१-०० पर्यंत पुढील ९० दिवसांपर्यंत निर्बंध करण्यात आले आहे.

सदर आदेश माझ्या सही शिक्क्यानिशी दिनांक २२ ऑगस्ट २०२० रोजी निर्गमित करण्यात येत आहे.

**सोमनाथ घार्गे,**
पोलीस उप आयुक्त (शहरे),
वाहतूक, भायखळा, मुंबई.

## BY THE DEPUTY COMMISSIONER OF POLICE (CITY), TRAFFIC HEADQUARTER, WORLI, MUMBAI

## TEMPORARY NOTIFICATION

No. I. W. No. 1055/DCP/Traffic (City)/2020.— In order to prevent obstruction, inconvenience to the public and to maintain smooth vehicular traffic movements and to avoid inconvenience to the members of the public, so to direct, I, Somnath Gharge, Dy. Commissioner of Police (City), Traffic, Brihan Mumbai, in exercise of the powers conferred upon me under section 115 of Motor Vehicles, Act, 1988 (59 of 1988) read with Government Notification Notification No. MVA 0589/CR 1061/TRA-2, dated 19th May 1990 do hereby order as under.

**No. 43/DCP/CITY/TEMP/TR./2020 :—**

Due to heavy rain, there was landslide at N. S. Patkar Marg (Pedder Road), Near Kemps Corner, Hanging Garden Malbar Hill and the road closed for traffic movement till further notice.

Due to road closure, traffic on B. A. Road, Sir. J. J. Road, Ibrahim Rehmatulla Road, Mohammed Ali Road. L. T. Road, P. D. Melo Road, increase considerably. For this purpose traffic on P. D. Melo Road needs to be diverted during peak hours as follows.

(1) P. D. Melo Road (south bond) from Wadibandar Junction to S.V.P. Road is being temporarily closed during (17-00 to 21-00 hrs.) for next 90 days.

(2) Also at Kundanlal Kata (south bond) to Y. M. Road is being temporaily closed during (17-00 to 21-00 hrs.) for next 90 days.

(3) Traffic from S. V. P. Road to Wadibandar junction taking right turn to Karnak Port is being temporarily closed during (17-00 to 21-00 hrs.) for next 90 days.

**Traffic towords Dongri, Bhendi Bazar Junction, Char Nal, J. J. Junction Alternative routes to divert traffic to Junction :—**

(1) Take a U-turn from P. D. Melo Road (South Bond) to Karnak Bunder and take a left a turn at P. D. Melo Road (North Bond) Wadibunder Junction to S. V. P. Road Char Nal, Dongri, J. J. Junction, Bhendi Bazar Junction.

(2) Similarly take right turn from Milet Bunder Junction and cross Kaklij Junction to Byculla Traffic Division jurisdiction boundary Dockyard Junction, Abbu Bakar Mulla Chowk, Maharana Pratap Chowk, Haribhau Wadgaonkar Chowk, St. Un Church, Nesbit Junction, Bhendi Bazar Junction, Charnal, Nurbag Dogri.

**Y. M. Road Alternative routes to divert traffic to the road :—**

(1) Take a U-turn from P. D. Melo Road (South Bond) to Karnak Bunder and P. D. Melo Road (North Bond) can take a left turn from Kundanlal Kata to Y. M. Road.

**Karnak Port Alternative routes to divert traffic to the road :—**

Vehicles travelling from S. V. P. Road, Wadibandar to Karnak Port will take a left turn at S. V. P. Road, Wadibundar Junction and take left turn to the P. D. Mello Road (North Bond)-Milet Port-U turn-P. D. Mello Road (South Bond) can go to Karnak Port.

Hence the Right turn from Wadibundar Junction and Kundanlal Kata, South Channel, Right turn from Wadibander Junction on S. V. P. Road during 17-00 to 21-00 hours is restricted for next 90 days.

Issued under my seal and signature on 22nd day of August, 2020.

SOMNATH GHARGE,
Dy. Commissioner of police (City),
Traffic, Mumbai.

## पोलीस अधीक्षक कार्यालय, ठाणे ग्रामीण यांजकडून

### आदेश

क्रमांक जिविशा/टे-१३/गणेशोत्सव/म.पो. ॲक्ट. ३६/२०२०-२८२९.— ज्याअर्थी, माझ्या असे निदर्शनास येत आहे की, दिनांक २२ ऑगस्ट २०२० ते दिनांक १ सप्टेंबर २०२० या कालावधीमध्ये गणेशोत्सव तसेच दिनांक २१ ऑगस्ट २०२० ते ३० ऑगस्ट २०२० या कालावधीत मुस्लीम बांधवांचा मोहरम हे सण-उत्सव मोठ्या उत्साहात साजरे होणार आहेत. ठाणे ग्रामीण जिल्ह्यात कमी अधिक प्रमाणात हिंदू-मुस्लीम अशी मिश्र/संमिश्र लोकवस्ती असून गणेशोत्सव व मोहरम या सण-उत्सवांदरम्यान सध्या सुरू असलेल्या कोविड१९ या संसर्गजन्य रोगाचा वाढता प्रादुर्भाव पहाता प्रतिबंदात्मक खबरदारीच्या उपाय योजना करणे जरुरीचे आहे.

त्याअर्थी, गणेशोत्सव व मोहरम सण-उत्सवांच्या दरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडून कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये म्हणून मी, डॉ. शिवाजी राठोड, पोलीस अधीक्षक, ठाणे ग्रामीण, मला महाराष्ट्र पोलीस अधिनियम, १९५१ चे कलम ३६ अन्वये प्राप्त असलेल्या अधिकारान्वये ठाणे ग्रामीण पोलीस घटकातील सर्व उप विभागीय पोलीस अधिकारी, सर्व पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी व बंदोबस्ताचे सर्व प्रभारी अधिकारी यांना दिनांक २० ऑगस्ट २०२० रोजी ००-०० ते दिनांक २ सप्टेंबर २०२० रोजी २४-०० वा. पर्यंत महाराष्ट्र पोलीस अधिनियम, १९५१ चे कलम ३६ अन्वये खालील अधिकार प्रदान करीत आहे.

(अ) रस्त्यावरील किंवा रस्त्याने जाणा-या मिरवणुकीतील किंवा जमावातील लोकांनी कशारितीने चालावे, त्यांनी वर्तणूक किंवा वागणूक कशी ठेवावी. या विषयी निर्देश देणे.

(ब) अशा कोणत्याही मिरवणुका या कोणत्या मार्गाने, कोणत्या वेळेत काढाव्यात किंवा काढू नयेत असे मार्ग अशा वेळा विहित करणे.

(क) सर्व मिरवणुकीच्या व जमावांच्या प्रसंगी व उपासनेच्यावेळी व कोणत्याही रस्त्याहून किंवा सार्वजनिक जागी किंवा सार्वजनिक स्थळी गर्दी होणार असेल किंवा अडथळा होण्याचा संभव असेल अशा सर्व प्रसंगी अडथळा न होऊ देणे यासाठी योग्य तो आदेश देणे.

(ड) सर्व रस्त्यावर व रस्त्यांमध्ये घाट किंवा घाटावर, सर्व धक्क्यांवर व धक्क्यांमध्ये आणि सार्वजनिक स्नानांच्या, कपडे धुण्याच्या व उतरण्याच्या जागांच्या ठिकाणी व जागांमध्ये, देवालय आणि इतर सर्व सार्वजनिक स्थळी सुव्यवस्था राखण्यासाठी योग्य ते आदेश देणे.

(इ) कोणत्याही रस्त्यात किंवा रस्त्याजवळ ढोल, ताशे व इतर वाद्ये वाजविणेचे व गाणी गाण्याचे, शिंगे व इतर कर्कष वाद्य वाजविणेचे विनियमन करणे व त्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी योग्य तो आदेश देणे.

(फ) कोणत्याही सार्वजनिक जागेत किंवा जागेजवळ किंवा कोणत्याही सार्वजनिक करमणुकीच्या ठिकाणी लोकांना उपद्रव होऊ नये म्हणून ध्वनिक्षेपकाचा (लाऊड स्पिकर) उपयोग करणे, विनियमन करणे व त्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी योग्य ते आदेश देणे.

(ग) सक्षम प्राधिका-याने या अधिनियमाची कलमे ३३, ३५, ३७ ते ४०, ४२, ४३ व ४५ अन्वये दिलेल्या कोणत्याही आदेशास अधीन असलेले व त्यास पुष्टी देणारे योग्य ते आदेश देणे.

सदरचा आदेश आज दिनांक १७ ऑगस्ट २०२० रोजी माझ्या सही शिक्क्यानिशी दिले असे.

**डॉ. शिवाजी राठोड,**
पोलीस अधीक्षक,
ठाणे ग्रामीण.

## जिल्हा उप निबंधक, सहकारी संस्था, रायगड-अलिबाग यांजकडून

### आदेश

क्रमांक जिउनि/कात-६/कलम १५६/कमळ ना.स.पत/२७०/सन २०२०.— महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम १५६(१) अन्वये मला प्रदान करण्यात आलेल्या शक्तीचा वापर करून मी, गोपाळ मावळे, जिल्हा उप निबंधक, सहकारी संस्था, रायगड-अलिबाग या आदेशान्वये, कमळ नागरी सहकारी पतपेढी म. अलिबाग, ता. अलिबाग, जिल्हा रायगड या संस्थेच्या खालील अधिका-यांस त्यांच्या नावापुढे दर्शविलेल्या कार्यक्षेत्रासाठी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम १०१ व कलम ९१ अन्वये प्राप्त झालेल्या वसुली प्रमाणपत्राची अंमलबजावणी/कर्ज वसुली करण्याकरिता महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम १५६ (१) व नियम १०७ अनुसार मालमत्ता जप्त करून व तिची विक्री करून रकमा वसूल करण्याचे (अपसेट प्राईज कायम करणे व विक्री कायम करणेची तरतूद वगळून) निबंधकाचे अधिकार खालील अटीस अधीन राहून दिनांक ९ जुलै २०२० पासून ते दिनांक ३१ मार्च २०२१ या कालावधीकरिता प्रदान करीत आहे :—

| अ.क्र. | अधिकार प्रदान करावयाचे अधिका-यांचे नाव | अधिकार प्रदान करावयाचे अधिका-याचा हुद्दा | शक्तीची व्याप्ती | कार्यक्षेत्र |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| १ | श्री. प्रमोद काशिनाथ म्हात्रे | उप महाव्यवस्थापक, मुख्य कार्यालय, अलिबाग. | वसुली अधिकारी | रायगड जिल्हा |
| २ | सौ. पूर्वा पुष्कर घाणेकर | व्यवस्थापिका-महाड शाखा | वसुली अधिकारी | रायगड जिल्हा |
| ३ | श्री. प्रमोद परशुराम पाटील | व्यवस्थापक, मोहपाडा शाखा | वसुली अधिकारी | रायगड जिल्हा |
| ४ | श्री. शेखर शंकर घरत | सिनिअर क्लार्क, मुख्य कार्यालय, अलिबाग. | वसुली अधिकारी | रायगड जिल्हा |
| ५ | श्री. लक्ष्मण वसंत पेंढारी | व्यवस्थापक-माणगांव शाखा | वसुली अधिकारी | रायगड जिल्हा |

**अटी व शर्ती** .—

(१) वसुली अधिकारी यांनी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम १५६ व नियम, १९६१ चे नियम १०७ मधील तरतुदींनुसार कर्ज वसुलीची कार्यवाही करावी. कर्ज वसुली करताना सहकार कायदा, नियम यातील तरतुदी व परिपत्रकीय सूचनांचे पालन न केल्याचे निदर्शनास आल्यास आवश्यक ती चौकशी करून आवश्यकता भासल्यास सदरचे प्रदान केलेले अधिकार तात्काळ काढून घेण्यात येतील.

(२) सदरचे अधिकार सहकार कायदा कलम १०१ व ९१ अन्वये प्राप्त वसुली दाखल्याची अंमलबजावणी करण्याकरिता असतील.

(३) वसुली अधिकारी यांनी दर महा सोबत जोडलेल्या विहीत नमुन्यात " अ-३ ", " अ-४ " व " ब " कर्ज वसुलीची माहिती संबंधित जिल्हा उप निबंधक, सहकारी संस्था यांचे कार्यालयास सादर करावी. ज्या सहकारी संस्थेचे कार्यक्षेत्र विभाग, दोन विभाग अथवा राज्य कार्यक्षेत्र आहे त्या संस्थांनी देखील त्यांचे मुख्य कार्यालय ज्या जिल्ह्यामध्ये आहे त्या जिल्हा उप निबंधक यांचे कार्यालयास माहिती सादर करावी.

(४) अधिकार प्रदान केलेल्या वसुली अधिकारी असलेल्या व्यक्तीची बदली झाल्यास किंवा सेवा निवृत्ती झाल्यास किंवा सेवेतून काढून टाकल्यास किंवा त्याचा मृत्यू झाल्यास, अशा अधिका-यास प्रदान केलेले आधिकार आपोआप रद्द होतील.

(५) वसुली अधिकारी यांनी वसूल केलेल्या संपूर्ण सरचार्ज रकमेचा भरणा वसूल केलेल्या महिन्यातच चलनाने शासकीय कोषागारात करावा. मुदत वाढीसाठी सरचार्ज शासकीय कोषागारात भरल्याचे पुरावे सादर करणे अनिवार्य राहील याची नोंद घ्यावी. वसुली अधिकारी यांनी वसूल केलेला सरचार्ज त्याचा शासकीय कोषागारात केलेला भरणा याबाबत संस्था स्तरावर स्वतंत्र नोंदवही ठेवण्यांत यावी. त्याबाबतचा नमुना " अ-१ ", " अ-२ ", " अ-३ ", " अ-४ ", सोबत जोडलेला आहे.

(६) मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी रिट याचिका क्र. १९४२/२०१३ दि बेसिन कॅथोलिक को-ऑप. बँक विरुद्ध महाराष्ट्र राज्य व इतर या याचिकेमध्ये दिनांक ५ डिसेंबर २०१५ रोजी दिलेला आदेश विचारात घेऊन वसुलीची कार्यवाही करताना महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० व नियम १९६१ अन्वये प्राप्त असलेल्या अधिकारानुसारच वसुलीची कार्यवाही करावी.

(७) वसुली अधिकारी यांनी नमूद केलेल्या कालावधीत वसुलीचे कामकाज समाधानकारक केले नसल्याचे निदर्शनास आल्यास किंवा प्रदान केलेल्या अधिकाराचा गैरवापर करीत असल्याचे निदर्शनास आल्यास, प्रदान केलेले अधिकार काढून घेतले जातील व भविष्यात असे कोणतेही अधिकार अशा व्यक्तीस प्रदान करण्यात येणार नाहीत.

(८) शासन निर्णय क्रमांक संकिर्ण-१५०४/प्र.क्र. २३१/१५-स, दिनांक २३ नोव्हेंबर २००६ अन्वये वसुली अधिका-यांना तीन सिंहाच्या राजमुद्रेचा वापर करता येणार नाही.

(९) वसुली अधिका-यास त्याच्या नावापुढे कोठेही '' महाराष्ट्र शासन नियुक्त '' आणि किंवा '' सिव्हील कोर्ट " " एक्झीक्युटीव्ह कोर्ट '' या शब्दांचा अथवा तत्सम शब्दांचा वापर करता येणार नाही. त्या ऐवजी '' वसुली अधिका-यांनी त्यांच्या नावापुढे " वसुली अधिकारी (महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० व नियम १९६१ चे नियम १०७ अन्वये) '' असे लिहावे.

(१०) वसुली अधिका-यास वसुलीसाठी वापर करण्यात येणा-या वाहनावर '' वसुली अधिकारी कमळ नागरी सहकारी पतपेढी म. अलिबाग, ता. अलिबाग '' असा फलक लावता येऊ शकेल.

(११) वसुली अधिका-याने पगार जप्तीची कार्यवाही करताना कर्जदाराच्या/जामीनदाराच्या पगार कपातीबाबत राष्ट्रीयीकृत बँका वा अन्य बँका यांचेकडे परस्पर वेतन कपातीचा आदेश देऊन परस्पर पगार कपात करता येणार नाही. संबंधित कर्जदार/जामीनदार ज्या आस्थापनेवर काम करीत आहे त्या आस्थापनेवरील आहरण व संवितरण अधिकारी/पगार करणारा अधिकारी यांचेमार्फत पगारातून कर्ज वसूल करण्याची कार्यवाही करावी.

(१२) वसुली अधिका-यास, थकबाकीदाराकडून वसुली दाखल्यानुसार वसूलपात्र रक्कम व सरचार्ज रक्कम याशिवाय इतर कोणतीही रक्कम वसूल करता येणार नाही.

(१३) या कार्यालयात दरमहा होणा-या विशेष वसुली अधिकारी यांचे आढावा सभेस आवश्यक त्या माहितीसह उपस्थित रहाणे आवश्यक आहे.

(१४) वाचावे क्र. ७ अन्वये कर्जदार यांचेकडून वसूल करावयाच्या हुकुमनाम्याच्या/वसुली दाखल्याच्या आदेशिकेचा खर्च वसूल करून वसुली दाखल्यांची अंमलबजावणी करताना नोटीस फी, पोस्टेज, स्टेशनरी, जाहिरात खर्च व प्रवास खर्च यासाठीच करावयाचा आहे. त्या व्यतिरिक्त इतर कोणत्याही कारणासाठी खर्च करता येणार नाही. तसेच आदेशात नमूद केलेनुसार संस्थेने वसूल केलेल्या खर्चाबाबत व त्याच्या विनियोगाबाबत तपशिलवार हिशोब ठेवणे बंधनकारक राहील.

अलिबाग,
दिनांक ९ जुलै २०२०.

**गोपाळ मावळे,**
जिल्हा उप निबंधक,
सहकारी संस्था, रायगड-अलिबाग.

## जिल्हा उप निबंधक, सहकारी संस्था, सिंधुदुर्ग यांजकडून

**वाचावे .—** (१) मा. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, म.रा.पुणे यांचेकडील परिपत्रक क्र. एडीएम/१८४/१५६(२), १९ मार्च १९६८.

(२) शासन अधिसूचना क्रमांक सीएसएल १६०५/सी.आर १२०/१५ सी, दिनांक २ एप्रिल २००५.

(३) मा. सहकार आयुक्त कार्यालयाचे परिपत्रक जा.क्र.ना.बँका/डी-४/ना.पत/क.१५६/प्रशिक्षण/०५, दिनांक १३ जुलै २००५.

(४) मा. सहकार आयुक्त कार्यालयाचे परिपत्रक जा.क्र.ना.पत/डी-४/पतसंस्था/का.क.१५६/११, दिनांक २१ नोव्हेंबर २०११ व दिनांक २४ जून २०१६ चे परिपत्रक.

(५) मा. सहकार आयुक्त कार्यालयाचे परिपत्रक जा.क्र.पतसंस्था/स.आ-५/वसुली अधिकारी नियुक्ती/फेरनियुक्ती/९/२०१७, दिनांक १ जानेवारी २०१७ चे परिपत्रक.

(६) मा. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, म.रा.पुणे यांचेकडील जा.क्र.पतसंस्था/स.आ-५/खर्च/वसुली आदेश/८७२/२०१८, दिनांक ६ एप्रिल २०१८.

(७) मा. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, म.रा.पुणे यांचेकडील जा.क्र.पतसंस्था/स.आ-५/खर्च/वसुली अधिकारी नियुक्ती/फेरनियुक्ती/२४७४/२०१८, दिनांक ३१ ऑक्टोबर २०१८.

(८) व्यवस्थापक, स्नेह नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, सावंतवाडी यांचेकडील दिनांक १८ मार्च २०२० रोजीचा प्रस्ताव.

### आदेश

जा.क्र.जिउनि/सिंधु/वि.५/का.क.१५६/स्नेह नागरी पतसंस्था/२०२०/७७२.—महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम १५६(१) अन्वये मला प्रदान करण्यात आलेल्या शक्तीचा वापर करून मी, माणिक बी. सांगळे, जिल्हा उप निबंधक, सहकारी संस्था, सिंधुदुर्ग या आदेशान्वये स्नेह नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, सावंतवाडी या पतसंस्थेच्या खालील अधिका-यांस त्यांच्या नावापुढे दर्शविलेल्या कार्यक्षेत्रासाठी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम १०१ व कलम ९१ अन्वये प्राप्त झालेल्या वसुली प्रमाणपत्राची अंमलबजावणी/कर्ज वसुली करण्याकरिता महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम १५६ (१) व नियम १०७ अनुसार मालमत्ता जप्त करून व तिची विक्री करून रकमा वसूल करण्याचे निबंधकाचे अधिकार खालील अटी व शर्तीस अधिन राहून या आदेशाच्या दिनांकापासून दिनांक ३१ मार्च २०२३ या कालावधीकरिता प्रदान करीत आहे :—

| अ.क्र. | अधिकार प्रदान केलेल्या अधिका-यांचे नांव | अधिकार प्रदान केलेल्या अधिका-याचा हुद्दा | शक्तीची व्याप्ती | कार्यक्षेत्र |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| १ | श्री. रमेश मधुकर निर्गुण | वसुली अधिकारी | वसुली अधिकारी | सिंधुदुर्ग जिल्हा |

**अटी व शर्ती .—**

(१) वसुली अधिकारी यांनी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम १५६ व नियम, १९६१ चे नियम १०७ मधील तरतुदींनुसार कर्ज वसुलीची कार्यवाही करावी. कर्ज वसुली करताना सहकार कायदा, नियम यातील तरतुदी व परिपत्रकीय सूचनांचे पालन न केल्याचे निदर्शनास आल्यास प्रदान करण्यात आलेले अधिकार तात्काळ काढून घेण्यात येतील.

(२) सदरचे अधिकार सहकार कायदा कलम १०१ व ९८ अन्वये प्राप्त वसुली दाखल्याची अंमलबजावणी करण्याकरिता प्रदान केलेले आहे.

(३) वसुली अधिकारी यांनी दरमहा संदर्भ क्रमांक ४ मध्ये सूचना देण्यात आल्याप्रमाणे विहित नमुन्यात "अ-३", 'अ-४', व 'ब' कर्ज वसुलीची माहिती जिल्हा उप निबंधक, सहकारी संस्था, सिंधुदुर्ग यांचे कार्यालयास सादर करावी.

(४) अधिकार प्रदान केलेल्या वसुली अधिकारी असलेल्या व्यक्तीची बदली झाल्यास किंवा सेवानिवृत्ती झाल्यास किंवा सेवेतून काढून टाकल्यास किंवा त्याचा मृत्यू झाल्यास, अशा अधिका-यास प्रदान केलेले आधिकार आपोआप रद्द होतील.

(५) मा. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडील आदेश दिनांक ६ एप्रिल २०१८ नुसार वसुली अधिकारी यांना हुकुमनामा/वसुली दाखला मधील वसूलपात्र रक्कम व सदर आदेशात नमूद हुकुमनाम्याच्या/वसुली दाखल्याच्या आदेशिकेचा खर्च (Cost of Process) या व्यतिरिक्त इतर कोणतीही रक्कम वसुली खर्च म्हणून थकबाकीदारांकडून वसूल करता येणार नाही.

(६) लिलावाद्वारे मालमत्ता विक्री केल्यानंतर १.५० % दरानेच आदेशिकेचा खर्च वसूल करता येईल अन्यथा उपरोक्त नमूद ज्या टप्प्यावर थकबाकी रक्कम पूर्ण वसूल होईल त्या टप्पेनिहाय दरानेच असा खर्च वसूल करावा.

(७) उक्त नमूद आदेशाप्रमाणे खर्चाचे दराची आकारणी व वसुली बँकेस एका कर्जदाराकडून जास्तीत जास्त रक्कम रुपये १.५० लाख मर्यादेतच आदेशिकेचा खर्च म्हणून रक्कम वसूल करता येईल.

(८) उपरोक्त अट क्र. ६ व ७ मध्ये नमूद केलेल्या रकमेव्यतिरिक्त वसुली अधिकारी यांनी जादा रक्कम वसुल केल्याचे निदर्शनास आलेस ते महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० व नियम १९६१ मधील तरतुदीनुसार कारवाईस पात्र राहतील.

(९) प्रस्तुत खर्चाचा वापर वसुली अधिकारी/संस्था यांनी वसुली दाखल्यांची अंमलबजावणी करताना नोटीस फी, पोस्टेज, स्टेशनरी जाहिरात खर्च व प्रवास खर्च यासाठीच करावयाचा आहे. या व्यतिरिक्त इतर कोणत्याही कारणासाठी खर्च करता येणार नाही.

(१०) बँकेने याप्रमाणे वसूल केलेल्या खर्चाबाबत व त्याच्या विनियोगाबाबत प्रकरणनिहाय हिशोब ठेवणे बंधनकारक राहील. सदरचा हिशोब बँकेच्या नियुक्त वैधानिक लेखापरिक्षकांना लेखापरीक्षण सुरु असताना पडताळणीसाठी/तपासणीसाठी सादर करणे बंधनकारक राहील.

(११) " मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी रिट याचिका क्रमांक १९४२/२०१३ " दि बेसीन कॅथॉलिक को-ऑप बँक विरुद्ध महाराष्ट्र राज्य व इतर या याचिकेमध्ये दिनांक ५ डिसेंबर २०१५ रोजी दिलेल्या आदेश विचारात घेऊन वसुलीची कार्यवाही करताना महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० व नियम, १९६१ अन्वये प्राप्त असलेल्या अधिकारानुसारच वसुलीची कार्यवाही करावी.

(१२) वसुली अधिकारी यांनी नमूद केलेल्या कालावधीत वसुलीचे कामकाज समाधानकारक केले नसल्याचे निदर्शनास आल्यास किंवा प्रदान केलेल्या अधिकाराचा गैरवापर करीत असल्याचे निदर्शनास आल्यास, प्रदान केलेले अधिकार काढून घेतले जातील व भविष्यात असे कोणतेही अधिकार अशा व्यक्तीस प्रदान करण्यात येणार नाहीत.

(१३) शासन निर्णय क्रमांक संकीर्ण. १५०४/प्र.क्र.२३१/१५-स, दिनांक २३ नोव्हेंबर २००६ अन्वये वसुली अधिका-यांना तीन सिंहाच्या राजमुद्रेचा वापर करता येणार नाही.

(१४) वसुली अधिका-यास त्याच्या नावापुढे कोठेही " महाराष्ट्र शासन नियुक्त " आणि किंवा " सिव्हील कोर्ट ", "एक्झीक्युटीव्ह कोर्ट " या शब्दांचा अथवा तत्सम शब्दांचा वापर करता येणार नाही. त्या ऐवजी वसुली अधिकारी यांनी त्यांच्या नावापुढे " वसुली अधिकारी (महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम १५६ (१) व नियम १०७ अन्वये)" असे लिहावे.

(१५) वसुली अधिका-यास वसुलीसाठी वापर करण्यात येणा-या वाहनावर " वसुली अधिकारी, "स्नेह नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, सावंतवाडी " असा फलक लावता येऊ शकेल.

(१६) वसुली अधिका-यांनी पगार जप्तीची कार्यवाही करताना कर्जदाराच्या/जामिनदाराच्या पगार कपातीबाबत राष्ट्रीयीकृत बँका वा अन्य बँका यांचेकडे परस्पर वेतन कपातीचा आदेश देऊन परस्पर पगार कपात करता येणार नाही. संबंधित कर्जदार/जामीनदार ज्या आस्थापनेवर काम करीत आहे त्या आस्थापनेवरील आहरण व संवितरण अधिकारी/पगार करणारा अधिकारी यांचेमार्फत पगारातून कर्ज वसूल करण्याची कार्यवाही करावी.

(१७) मा. सहकार आयुक्त कार्यालयाकडील परिपत्रक दिनांक १ जानेवारी २०१७ व दिनांक ३१ ऑक्टोबर २०१८ मधील दिलेल्या सूचनांचे वसुली अधिका-याने पालन करावे.

सिंधुदुर्ग,
दिनांक २४ मार्च २०२०.

**माणिक बी. सांगळे,**
जिल्हा उप निबंधक,
सहकारी संस्था, सिंधुदुर्ग.

## जिल्हाधिकारी व जिल्हादंडाधिकारी कार्यालय, पालघर यांजकडून

### आदेश

क्रमांक गृह/का. १/टे.४/मनाई आदेश/एस.आर.०३/२०.— ज्याअर्थी, भारतीय रेल्वे कायदा, १९८९ चे कलम २० मध्ये Not-withstanding anything contained in any other law, the Central Government may, if it is of the opinion that any work undertaken or may be undertaken, is likely to alter or impede the natural course of water flow or cause an increase in the volume of such flow endeangering any cutting, embankment or other work on a railway, issue directions in writing to any person, officer or authority responsible for such work to close, regulate or prohibit that work, अशी तरतूद केली आहे ;

ज्याअर्थी, उपोद्घातातील अनुक्रमांक २ वर अंतर्भूत असलेल्या पत्रान्वये मुख्य ब्रिज अभियंता, पश्चिम रेल्वे, चर्चगेट, मुंबई यांनी असे निदर्शनास आणून दिले आहे की, रेल्वे ब्रिज क्र. ९२ व ९३ च्या कार्यक्षेत्रामध्ये व त्यांच्या पोहोचमार्गामधील रेती उत्खनन व नौकानयन मार्ग वाहतुकीसाठी बंद करणे आवश्यक आहे ;

ज्याअर्थी, उपोद्घातातील अनुक्रमांक २ वर अंतर्भूत असलेल्या पत्रान्वये मुख्य ब्रिज अभियंता यांनी पश्चिम रेल्वेवरील सदर ब्रिज बाबतचे महत्त्व व रेल्वे ब्रिज बाबतचा संभाव्य धोका उद्‌भवल्यास होणारे परीणाम याबाबत कळविले आहे ;

ज्याअर्थी, महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ चे कलम २० अन्वये सर्व सार्वजनिक रस्ते, गल्ल्या आणि मार्ग, पूल, खंदक, धरणे आणि त्यांच्यावरील किंवा त्यांच्या बाजूची कुंपणे आणि पूर्ण भरतीच्या पाण्याच्या खुणेच्या खालील समुद्राचा, बंदराचा व खाड्यांचा आणि नद्या, ओहोळ, नाले, सरोवर व तळी यांचा तळ आणि सर्व कालवे व पाण्याचे पाट आणि साचलेले सर्व पाणी व वाहते पाणी इत्यादी वर राज्य शासनाचा मालकी हक्क आहे ;

ज्याअर्थी, मुंबई उच्च न्यायालयाकडील पीआयएल क्र. २७/२०११ मधील दिनांक ३ ऑक्टोबर २०११ च्या आदेशान्वये रेल्वे ब्रिज क्र. ९२ च्या क्षेत्रातील रोडचा वापर रेती वाहतूक ट्रकसाठी प्रतिबंधित केला आहे ;

ज्याअर्थी, जिल्हाधिकारी, पालघर यांचेकडील अर्धशासकीय पत्र क्र. अ.शा.प.क्र. रेतीगट/गौख/कावि-४२९/१६, दिनांक ५ ऑगस्ट २०१६ अन्वये पोलीस अधीक्षक, पालघर यांना वैतरणा नदीवरील रेल्वे ब्रिज व इतर ब्रिजच्या ६०० मीटर कार्यक्षेत्रात २४×७ पोलीस गस्त ठेवण्याच्या सूचना दिल्या आहेत ;

ज्याअर्थी, शासन निर्णय क्रमांक गौखनि-१०/०५१२/प्र.क्र. ३००/ख, दिनांक १२ मार्च २०१३ व शासन निर्णय क्र. गौखनि-१०/१०१४/प्र.क्र. ५००/ख, दिनांक २१ मे २०१५ अन्वये पुलाच्या दोन्ही बाजूस ६०० मीटर (२००० फूट) च्या क्षेत्रात रेती उत्खननास परवानगी देणेत येत नाही ;

ज्याअर्थी, राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन कायदा, २००५ अन्वये जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी यांना राष्ट्रीय व्यवस्थापन प्राधिकरणाचे अध्यक्ष म्हणून एखादी संभाव्य आपत्ती टाळण्यासाठी कलम ३० व ३४ अन्वये निर्देश देण्याचे अधिकार आहेत ;

ज्याअर्थी, फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम १४४ अन्वये उपद्रवाच्या किंवा आशंकित संकटाच्या अशा तातडीच्या प्रकरणात आदेश काढण्याचा जो अधिकार आहे. त्यातील कलम (१) अन्वये जेथे जिल्हादंडाधिका-याला, उप विभागीय दंडाधिका-याच्या किंवा राज्य शासनाने या संबंधात खास अधिकार प्रदान केलेल्या अन्य कोणत्याही कार्यकारी दंडाधिका-याच्या मते या कलमाखाली कार्यवाही करण्यास पुरेसे कारण असेल आणि तात्काळ प्रतिबंध करणे किंवा सत्वर उपाययोजना इष्ट असेल त्या प्रकरणी एखाद्या व्यक्तीला विवक्षित कृती करण्यापासून परावृत्त राहण्याचा अथवा तिच्या कब्जातील किंवा तिच्या व्यवस्थापनाखालील विवक्षित मालमत्तेबाबत विवक्षित बंदोबस्त करण्याचा निर्देश दिल्यास कायदेशिरपणे नेमलेल्या व्यक्तीस अडथळा, त्रास किंवा क्षती पोहोचण्यास अथवा मानवजिवीताला, आरोग्याला किंवा सुरक्षिततेला संकट उत्पन्न होण्यास अथवा सार्वजनिक प्रशांतता बिघडण्यास अथवा दंग्यास किंवा दंगलीस त्यामुळे प्रतिबंध होण्याचा संभव आहे किंवा प्रतिबंध होण्याला ते उपकारक आहे असे अशा दंडाधिका-याला वाटले तर, असा दंडाधिकारी त्या प्रकरणाच्या महत्त्वाच्या तथ्यांचे निवेदन अंतर्भूत असलेला एक लेखी आदेश काढून व कलम १३४ मध्ये उपबंधित केलेल्या रितीने तो बजावून त्याद्वारे तसा निदेश देऊ शकेल.

(२) आणीबाणीच्या प्रसंगी किंवा जिच्याविरूद्ध आदेश काढलेला असेल त्या व्यक्तीवर योग्य अवधीत नोटीस बजावणे परिस्थितीमुळे शक्य नसेल अशा प्रकरणात, या कलमाखाली आदेश एकतर्फी देता येईल.

(३) या कलमाखालील आदेश विशिष्ठ व्यक्तीला अथवा विशिष्ठ स्थळी किंवा क्षेत्रात राहणा-या व्यक्तींना, अथवा एखाद्या विशिष्ठ स्थळी किंवा क्षेत्रात राबता असणा-या किंवा तेथे प्रसंगवशात येणा-या सर्वसाधारण जनतेला उद्देशून काढता येईल, अशा ज्या तरतुदी नमूद आहेत.

त्याअर्थी, मी, डॉ. कैलास शिंदे, जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी, पालघर मला फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम १४४ (१) (२) व (३) आणि राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन कायदा, २००५ चे कलम ३० व ३४ अन्वये प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करून वैतरणा नदीवरील रेल्वेपुलाच्या (पूल क्र. ९२ व ९३) दोन्ही बाजूस ६०० मीटर कार्यक्षेत्रात दिनांक २६ जानेवारी २०२० रोजी ००-०१ वा. पासून ते दिनांक २४ मार्च २०२० रोजी ००-०० वाजेपर्यंतच्या कालावधीत पोलीस विभाग, महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड, नौदल, मत्स्यव्यवसाय, वन कोस्ट गार्ड, उत्पादन शुल्क इत्यादी शासकीय विभाग वगळून इतर सर्व व्यक्तींना वैतरणा नदीवरील रेल्वेपुलाच्या (पूल क्र. ९२ व ९३) दोन्ही बाजूस ६०० मीटर अंतरात जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी, पालघर यांचे पूर्वपरवानगीशिवाय कोणत्याही प्रकारे नौकानयन मार्गाचा वापर करणेस मनाई आदेश लागू करीत आहे.

सदरचा आदेश आज दिनांक १८ जानेवारी, २०२० रोजी माझे सहीशिक्क्यानिशी दिला असे.

**डॉ. कैलास शिंदे,**
जिल्हादंडाधिकारी, पालघर.

## जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, सिंधुदुर्ग यांजकडून

**वाचावे .—** (१) मा. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, म.रा.पुणे यांचे कडील परिपत्रक क्र. एडीएम/१८४/१५६(२), १९ मार्च १९६८.

(२) शासन अधिसूचना क्रमांक सीएसएल १६०५/सि.आर १२०/१५ सी, दिनांक २ एप्रिल २००५.

(३) मा. सहकार आयुक्त कार्यालयाचे परिपत्रक जा.क्र.ना.बँका/डी-४/ना.पत/क.१५६/प्रशिक्षण/०५, दिनांक १३ जुलै २००५.

(४) मा. सहकार आयुक्त कार्यालयाचे परिपत्रक जा.क्र.ना.पत/डी-४/पतसंस्था/का.क.१५६/११, दिनांक २१ नोव्हेंबर २०११ व दिनांक २४ जून २०१६ चे परिपत्रक.

(५) मा. सहकार आयुक्त कार्यालयाचे परिपत्रक जा.क्र.पतसंस्था/स.आ-५/वसुली अधिकारी नियुक्ती/फेरनियुक्ती/९/२०१७, दिनांक १ जानेवारी २०१७ चे परिपत्रक.

(६) मा. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, म.रा.पुणे यांचेकडील जा.क्र.पतसंस्था/स.आ-५/खर्च/वसुली आदेश/८७२/२०१८, दिनांक ६ एप्रिल २०१८.

(७) मा. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, म.रा.पुणे यांचेकडील जा.क्र.पतसंस्था/स.आ-५/खर्च/वसुली अधिकारी नियुक्ती/फेरनियुक्ती/२४७४/२०१८, दिनांक ३१ ऑक्टोबर २०१८.

(८) प्र. व्यवस्थापक, सिंधुदुर्ग जिल्हा व्यापारी सहकारी पतसंस्था मर्यादित, सिंधुदुर्ग, यांचेकडील दिनांक २४ फेब्रुवारी २०२० रोजीचा प्रस्ताव.

### आदेश

क्रमांक जिउनि/सिंधु/वि.५/का.क.१५६/सिंधुदुर्ग व्यापारी पतसंस्था/२०२०/७३७.—महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम १५६(१) अन्वये मला प्रदान करण्यात आलेल्या शक्तीचा वापर करून मी, माणिक बी. सांगळे, जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, सिंधुदुर्ग या आदेशान्वये सिंधुदुर्ग जिल्हा व्यापारी सहकारी पतसंस्था मर्यादित, सिधुदुर्ग या संस्थेच्या खालील अधिका-यांस त्यांच्या नावापुढे दर्शविलेल्या कार्यक्षेत्रासाठी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम १०१ व कलम ९१ अन्वये प्राप्त झालेल्या वसुली प्रमाणपत्राची अंमलबजावणी/कर्ज वसुली करण्याकरिता महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम १५६ (१) व नियम १०७ अनुसार मालमत्ता जप्त करून व तिची विक्री करून रकमा वसूल करण्याचे निबंधकाचे अधिकार खालील अटी व शर्तीस अधिन राहून या आदेशाच्या दिनांकापासून दिनांक ३१ मार्च २०२१ या कालावधीकरिता प्रदान करीत आहे :—

| अ.क्र. | अधिकार प्रदान केलेल्या अधिका-यांचे नांव | अधिकार प्रदान केलेल्या अधिका-याचा हुद्दा | शक्तीची व्याप्ती | कार्यक्षेत्र |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| १ | श्री. शरद नारायण ठाकूर | वसुली अधिकारी | वसुली अधिकारी | सिंधुदुर्ग जिल्हा |

**अटी व शर्ती** .—

(१) वसुली अधिकारी यांनी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम १५६ व नियम, १९६१ चे नियम १०७ मधील तरतुदींनुसार कर्ज वसुलीची कार्यवाही करावी. कर्ज वसुली करताना सहकार कायदा, नियम यातील तरतुदी व परिपत्रकीय सूचनांचे पालन न केल्याचे निदर्शनास आल्यास प्रदान करण्यात आलेले अधिकार तात्काळ काढून घेण्यात येतील.

(२) सदरचे अधिकार सहकार कायदा कलम १०१ व ९८ अन्वये प्राप्त वसुली दाखल्याची अंमलबजावणी करण्याकरिता प्रदान केलेले आहे.

(३) वसुली अधिकारी यांनी दरमहा संदर्भ क्रमांक ४ मध्ये सूचना देण्यात आल्याप्रमाणे विहित नमुन्यात "अ-३", 'अ-४', व 'ब' कर्ज वसुलीची माहिती जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, सिंधुदुर्ग यांचे कार्यालयास सादर करावी.

(४) अधिकार प्रदान केलेल्या वसुली अधिकारी असलेल्या व्यक्तीची बदली झाल्यास किंवा सेवानिवृत्ती झाल्यास किंवा सेवेतून काढून टाकल्यास किंवा त्याचा मृत्यू झाल्यास, अशा अधिका-यास प्रदान केलेले आधिकार आपोआप रद्द होतील.

(५) मा. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडील आदेश दिनांक ६ एप्रिल २०१८ नुसार वसुली अधिकारी यांना हुकुमनामा/वसुली दाखला मधील वसुलपात्र रक्कम व सदर आदेशात नमूद हुकुमनाम्याच्या/वसुली दाखल्याच्या आदेशिकेचा खर्च (Cost of Process) या व्यतिरिक्त इतर कोणतीही रक्कम वसुली खर्च म्हणून थकबाकीदारांकडून वसुल करता येणार नाही.

(६) लिलावाद्वारे मालमत्ता विक्री केल्यानंतर १.५० % दरानेच आदेशिकेचा खर्च वसुल करता येईल अन्यथा उपरोक्त नमूद ज्या टप्प्यावर थकबाकी रक्कम पूर्ण वसुल होईल त्या टप्पेनिहाय दरानेच असा खर्च वसुल करावा.

(७) उक्त नमूद आदेशाप्रमाणे खर्चाचे दराची आकारणी व वसुली बँकेस एका कर्जदाराकडून जास्तीत जास्त रक्कम रुपये १.५० लाख मर्यादेतच आदेशिकेचा खर्च म्हणून रक्कम वसुल करता येईल.

(८) उपरोक्त अट क्र. ६ व ७ मध्ये नमूद केलेल्या रकमेव्यतिरिक्त वसुली अधिकारी यांनी जादा रक्कम वसुल केल्याचे निदर्शनास आलेस ते महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व नियम १९६१ मधील तरतुदीनुसार कारवाईस पात्र राहतील.

(९) प्रस्तुत खर्चाचा वापर वसुली अधिकारी/संस्था यांनी वसुली दाखल्यांची अंमलबजावणी करताना नोटीस फी, पोस्टेज, स्टेशनरी जाहिरात खर्च व प्रवास खर्च यासाठीच करावयाचा आहे. या व्यतिरिक्त इतर कोणत्याही कारणासाठी खर्च करता येणार नाही.

(१०) बँकेने याप्रमाणे वसुल केलेल्या खर्चाबाबत व त्याच्या विनियोगाबाबत प्रकरणनिहाय हिशोब ठेवणे बंधनकारक राहील. सदरचा हिशोब बँकेच्या नियुक्त वैधानिक लेखापरिक्षकांना लेखापरीक्षण सुरु असताना पडताळणीसाठी/तपासणीसाठी सादर करणे बंधनकारक राहील.

(११) "मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी रिट याचिका क्रमांक १९४२/२०१३" दि बेसीन कॅथॉलिक को-ऑप बँक विरुद्ध महाराष्ट्र राज्य व इतर या याचिकेमध्ये दिनांक ५ डिसेंबर २०१५ रोजी दिलेल्या आदेश विचारात घेऊन वसुलीची कार्यवाही करताना महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व नियम १९६१ अन्वये प्राप्त असलेल्या अधिकारनुसारच वसुलीची कार्यवाही करावी.

(१२) वसुली अधिकारी यांनी नमूद केलेल्या कालावधीत वसुलीचे कामकाज समाधानकारक केले नसल्याचे निदर्शनास आल्यास किंवा प्रदान केलेल्या अधिकाराचा गैरवापर करीत असल्याचे निदर्शनास आल्यास, प्रदान केलेले अधिकार काढून घेतले जातील व भविष्यात असे कोणतेही अधिकार अशा व्यक्तीस प्रदान करण्यात येणार नाहीत.

(१३) शासन निर्णय क्रमांक संकीर्ण. १५०४/प्र.क्र.२३१/१५-स, दिनांक २३ नोव्हेंबर २००६ अन्वये वसुली अधिका-यांना तीन सिंहाच्या राजमुद्रेचा वापर करता येणार नाही.

(१४) वसुली अधिका-यास त्याच्या नावापुढे कोठेही " महाराष्ट्र शासन नियुक्त " आणि किंवा " सिव्हील कोर्ट ", "एक्झीक्युटीव्ह कोर्ट " या शब्दांचा अथवा तत्सम शब्दांचा वापर करता येणार नाही. त्या ऐवजी वसुली अधिकारी यांनी त्यांच्या नावापुढे " वसुली अधिकारी (महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम १५६ (१) व नियम १०७ अन्वये)" असे लिहावे.

(१५) वसुली अधिका-यास वसुलीसाठी वापर करण्यात येणा-या वाहनावर " वसुली अधिकारी, "सिंधुदुर्ग जिल्हा व्यापारी सहकारी पतसंस्था मर्यादित, सिंधुदुर्ग " असा फलक लावता येऊ शकेल.

(१६) वसुली अधिका-यांनी पगार जप्तीची कार्यवाही करताना कर्जदाराच्या/जामीनदाराच्या पगार कपातीबाबत राष्ट्रीयीकृत बँका वा अन्य बँका यांचेकडे परस्पर वेतन कपातीचा आदेश देऊन परस्पर पगार कपात करता येणार नाही. संबंधित कर्जदार/जामीनदार ज्या आस्थापनेवर काम करीत आहे त्या आस्थापनेवरील आहरण व संवितरण अधिकारी/पगार करणारा अधिकारी यांचेमार्फत पगारातून कर्ज वसूल करण्याची कार्यवाही करावी.

(१७) मा. सहकार आयुक्त कार्यालयाकडील परिपत्रक दिनांक १ जानेवारी २०१७ व दिनांक ३१ ऑक्टोबर २०१८ मधील दिलेल्या सूचनांचे वसुली अधिका-याने पालन करावे.

सिंधुदुर्ग,
दिनांक १७ मार्च २०२०.

**माणिक बी. सांगळे,**
जिल्हा उपनिबंधक,
सहकारी संस्था, सिंधुदुर्ग.

## जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, सिंधुदुर्ग यांजकडून

**वाचावे .—** (१) मा. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, म.रा.पुणे यांचे कडील परिपत्रक क्र. एडीएम/१८४/१५६(२), १९ मार्च १९६८.

(२) शासन अधिसूचना क्रमांक सीएसएल १६०५/सी.आर १२०/१५ सी, दिनांक २ एप्रिल २००५.

(३) मा. सहकार आयुक्त कार्यालयाचे परिपत्रक जा.क्र.ना.बँका/डी-४/ना.पत/क.१५६/प्रशिक्षण/०५, दिनांक १३ जुलै २००५.

(४) मा. सहकार आयुक्त कार्यालयाचे परिपत्रक जा.क्र.ना.पत/डी-४/पतसंस्था/का.क.१५६/११, दिनांक २१ नोव्हेंबर २०११ व दिनांक २४ जून २०१६ चे परिपत्रक.

(५) मा. सहकार आयुक्त कार्यालयाचे परिपत्रक जा.क्र.पतसंस्था/स.आ-५/वसुली अधिकारी नियुक्ती/फेरनियुक्ती/९/२०१७, दिनांक १ जानेवारी २०१७ चे परिपत्रक.

(६) मा. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, म.रा.पुणे यांचेकडील जा.क्र.पतसंस्था/स.आ-५/खर्च/वसुली आदेश/८७२/२०१८, दिनांक ६ एप्रिल २०१८.

(७) मा. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, म.रा.पुणे यांचेकडील जा.क्र.पतसंस्था/स.आ-५/खर्च/वसुली अधिकारी नियुक्ती/फेरनियुक्ती/२४७४/२०१८, दिनांक ३१ ऑक्टोबर २०१८.

(८) मुख्य कार्यकारी अधिकारी, दि देवगड अर्बन को-ऑप. बँक लि., देवगड यांचे कार्यालयाकडील दिनांक २३ मार्च २०२० रोजीचा प्रस्ताव.

### आदेश

क्रमांक जिउनि/सिंधु/वि.५/का.क.१५६/देवगड अर्बन बँक/२०२०/८९१.—महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम १५६(१) अन्वये मला प्रदान करण्यात आलेल्या शक्तीचा वापर करून मी, माणिक बी. सांगळे, जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, सिंधुदुर्ग या आदेशान्वये दि देवगड अर्बन को-ऑपरेटीव्ह बँक लिमिटेड, देवगड या बँकेच्या खालील अधिका-यांस त्यांच्या नावापुढे दर्शविलेल्या कार्यक्षेत्रासाठी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम १०१ व कलम ९१ अन्वये प्राप्त झालेल्या वसुली प्रमाणपत्राची अंमलबजावणी/कर्ज वसुली करण्याकरिता महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम १५६ (१) व नियम १०७ अनुसार मालमत्ता जप्त करून व तिची विक्री करून रकमा वसूल करण्याचे निबंधकाचे अधिकार खालील अटी व शर्तीस अधिन राहून या आदेशाच्या दिनांकापासून दिनांक ३१ मार्च २०२३ या कालावधीकरिता प्रदान करीत आहे :—

| अ.क्र. | अधिकार प्रदान केलेल्या अधिका-यांचे नांव | अधिकार प्रदान केलेल्या अधिका-याचा हुद्दा | शक्तीची व्याप्ती | कार्यक्षेत्र |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| १ | श्री. श्रीकांत भालचंद्र बिडये | तृतीय श्रेणी, अधिकारी | वसुली अधिकारी | सिंधुदुर्ग जिल्हा. |

**अटी व शर्ती .—**

(१) वसुली अधिकारी यांनी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम १५६ व नियम, १९६१ चे नियम १०७ मधील तरतुदींनुसार कर्ज वसुलीची कार्यवाही करावी. कर्ज वसुली करताना सहकार कायदा, नियम यातील तरतुदी व परिपत्रकीय सूचनांचे पालन न केल्याचे निदर्शनास आल्यास प्रदान करण्यात आलेले अधिकार तात्काळ काढून घेण्यात येतील.

(२) सदरचे अधिकार सहकार कायदा कलम १०१ व ९८ अन्वये प्राप्त वसुली दाखल्याची अंमलबजावणी करण्याकरिता प्रदान केलेले आहे.

(३) वसुली अधिकारी यांनी दरमहा संदर्भ क्रमांक ४ मध्ये सूचना देण्यात आल्याप्रमाणे विहित नमुन्यात “अ-३”, ‘अ-४’, व ‘ब’ कर्ज वसुलीची माहिती जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, सिंधुदुर्ग यांचे कार्यालयास सादर करावी.

(४) अधिकार प्रदान केलेल्या वसुली अधिकारी असलेल्या व्यक्तीची बदली झाल्यास किंवा सेवानिवृत्ती झाल्यास किंवा सेवेतून काढून टाकल्यास किंवा त्याचा मृत्यू झाल्यास, अशा अधिका-यास प्रदान केलेले आधिकार आपोआप रद्द होतील.

(५) मा. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडील आदेश दिनांक ६ एप्रिल २०१८ नुसार वसुली अधिकारी यांना हुकुमनामा/वसुली दाखला मधील वसुलपात्र रक्कम व सदर आदेशात नमूद हुकुमनाम्याच्या/वसुली दाखल्याच्या आदेशिकेचा खर्च (Cost of Process) या व्यतिरिक्त इतर कोणतीही रक्कम वसुली खर्च म्हणून थकबाकीदारांकडून वसुल करता येणार नाही.

(६) लिलावाद्वारे मालमत्ता विक्री केल्यानंतर १.५० % दरानेच आदेशिकेचा खर्च वसुल करता येईल अन्यथा उपरोक्त नमूद ज्या टप्प्यावर थकबाकी रक्कम पूर्ण वसुल होईल त्या टप्पेनिहाय दरानेच असा खर्च वसुल करावा.

(७) उक्त नमूद आदेशाप्रमाणे खर्चाचे दराची आकारणी व वसुली बँकेस एका कर्जदाराकडून जास्तीत जास्त रक्कम रुपये १.५० लाख मर्यादेतच आदेशिकेचा खर्च म्हणून रक्कम वसुल करता येईल.

(८) उपरोक्त अट क्र. ६ व ७ मध्ये नमूद केलेल्या रकमेव्यतिरिक्त वसुली अधिकारी यांनी जादा रक्कम वसुल केल्याचे निदर्शनास आलेस ते महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व नियम १९६१ मधील तरतुदीनुसार कारवाईस पात्र राहतील.

(९) प्रस्तुत खर्चाचा वापर वसुली अधिकारी/संस्था यांनी वसुली दाखल्यांची अंमलबजावणी करताना नोटीस फी, पोस्टेज, स्टेशनरी जाहिरात खर्च व प्रवास खर्च यासाठीच करावयाचा आहे. या व्यतिरिक्त इतर कोणत्याही कारणासाठी खर्च करता येणार नाही.

(१०) बँकेने याप्रमाणे वसुल केलेल्या खर्चाबाबत व त्याच्या विनियोगाबाबत प्रकरणनिहाय हिशोब ठेवणे बंधनकारक राहील. सदरचा हिशोब बँकेच्या नियुक्त वैधानिक लेखापरिक्षकांना लेखापरीक्षण सुरु असताना पडताळणीसाठी/तपासणीसाठी सादर करणे बंधनकारक राहील.

(११) "मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी रिट याचिका क्रमांक १९४२/२०१३" दि बेसीन कॅथॉलिक को-ऑप बँक विरुद्ध महाराष्ट्र राज्य व इतर या याचिकेमध्ये दिनांक ५ डिसेंबर २०१५ रोजी दिलेल्या आदेश विचारात घेऊन वसुलीची कार्यवाही करताना महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व नियम १९६१ अन्वये प्राप्त असलेल्या अधिकारनुसारच वसुलीची कार्यवाही करावी.

(१२) वसुली अधिकारी यांनी नमूद केलेल्या कालावधीत वसुलीचे कामकाज समाधानकारक केले नसल्याचे निदर्शनास आल्यास किंवा प्रदान केलेल्या अधिकाराचा गैरवापर करीत असल्याचे निदर्शनास आल्यास, प्रदान केलेले अधिकार काढून घेतले जातील व भविष्यात असे कोणतेही अधिकार अशा व्यक्तीस प्रदान करण्यात येणार नाहीत.

(१३) शासन निर्णय क्रमांक संकीर्ण. १५०४/प्र.क्र.२३१/१५-स, दिनांक २३ नोव्हेंबर २००६ अन्वये वसुली अधिका-यांना तीन सिंहाच्या राजमुद्रेचा वापर करता येणार नाही.

(१४) वसुली अधिका-यास त्याच्या नावापुढे कोठेही " महाराष्ट्र शासन नियुक्त " आणि किंवा " सिव्हील कोर्ट ", "एक्झीक्युटीव्ह कोर्ट " या शब्दांचा अथवा तत्सम शब्दांचा वापर करता येणार नाही. त्या ऐवजी वसुली अधिकारी यांनी त्यांच्या नावापुढे " वसुली अधिकारी (महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम १५६ (१) व नियम १०७ अन्वये)" असे लिहावे.

(१५) वसुली अधिका-यास वसुलीसाठी वापर करण्यात येणा-या वाहनावर " वसुली अधिकारी, " दि देवगड अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड, देवगड " असा फलक लावता येऊ शकेल.

(१६) वसुली अधिका-यांनी पगार जप्तीची कार्यवाही करताना कर्जदाराच्या/जामीनदाराच्या पगार कपातीबाबत राष्ट्रीयीकृत बँका वा अन्य बँका यांचेकडे परस्पर वेतन कपातीचा आदेश देऊन परस्पर पगार कपात करता येणार नाही. संबंधित कर्जदार/जामीनदार ज्या आस्थापनेवर काम करीत आहे त्या आस्थापनेवरील आहरण व संवितरण अधिकारी/पगार करणारा अधिकारी यांचेमार्फत पगारातून कर्ज वसूल करण्याची कार्यवाही करावी.

(१७) मा. सहकार आयुक्त कार्यालयाकडील परिपत्रक दिनांक १ जानेवारी २०१७ व दिनांक ३१ ऑक्टोबर २०१८ मधील दिलेल्या सूचनांचे वसुली अधिका-याने पालन करावे.

सिंधुदुर्ग,
दिनांक ८ मे २०२०.

**माणिक बी. सांगळे,**
जिल्हा उपनिबंधक,
सहकारी संस्था, सिंधुदुर्ग.

## जिल्हा उप निबंधक सहकारी संस्था, सिंधुदुर्ग यांजकडून

**वाचावे .—** (१) मा. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, म.रा.पुणे यांचेकडील परिपत्रक क्र. एडीएम/१८४/१५६(२), १९ मार्च १९६८.

(२) शासन अधिसूचना क्रमांक सीएसएल १६०५/सी.आर १२०/१५ सी, दिनांक २ एप्रिल २००५.

(३) मा. सहकार आयुक्त कार्यालयाचे परिपत्रक जा.क्र.ना.बँका/डी-४/ना.पत/क.१५६/प्रशिक्षण/०५, दिनांक १३ जुलै २००५.

(४) मा. सहकार आयुक्त कार्यालयाचे परिपत्रक जा.क्र.ना.पत/डी-४/पतसंस्था/का.क.१५६/११, दिनांक २१ नोव्हेंबर २०११ व दिनांक २४ जून २०१६ चे परिपत्रक.

(५) मा. सहकार आयुक्त कार्यालयाचे परिपत्रक जा.क्र.पतसंस्था/स.आ-५/वसुली अधिकारी नियुक्ती/फेरनियुक्ती/९/२०१७, दिनांक १ जानेवारी २०१७ चे परिपत्रक.

(६) मा. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, म.रा.पुणे यांचेकडील जा.क्र.पतसंस्था/स.आ-५/खर्च/वसुली आदेश/८७२/२०१८, दिनांक ६ एप्रिल २०१८.

(७) मा. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, म.रा.पुणे यांचेकडील जा.क्र.पतसंस्था/स.आ-५/खर्च/वसुली अधिकारी नियुक्ती/फेरनियुक्ती/२४७४/२०१८, दिनांक ३१ ऑक्टोबर २०१८.

(८) अध्यक्ष/सचिव, प्रमिला शिवराम जाधव सहकारी पतसंस्था मर्यादित, कडावल यांचेकडील दिनांक २७ मार्च २०२० रोजीचा प्रस्ताव.

### आदेश

जा.क्र.जिउनि/सिंधु/वि.५/का.क.१५६/प्रमिला शिवराम जाधव पत./२०२०.—महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम १५६(१) अन्वये मला प्रदान करण्यात आलेल्या शक्तीचा वापर करून मी, माणिक बी. सांगळे, जिल्हा उप निबंधक, सहकारी संस्था, सिंधुदुर्ग या आदेशान्वये प्रमिला शिवराम जाधव सहकारी पतसंस्था मर्यादित, कडावल या पतसंस्थेच्या खालील अधिका-यांस त्यांच्या नावापुढे दर्शविलेल्या कार्यक्षेत्रासाठी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम १०१ व कलम ९१ अन्वये प्राप्त झालेल्या वसुली प्रमाणपत्राची अंमलबजावणी/कर्ज वसुली करण्याकरिता महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम १५६ (१) व नियम १०७ अनुसार मालमत्ता जप्त करून व तिची विक्री करून रकमा वसूल करण्याचे निबंधकाचे अधिकार खालील अटी व शर्तीस अधिन राहून या आदेशाच्या दिनांकापासून दिनांक ३१ मार्च २०२३ या कालावधीकरिता प्रदान करीत आहे :—

| अ.क्र. | अधिकार प्रदान केलेल्या अधिका-याचे नाव | अधिकार प्रदान केलेल्या अधिका-याचा हुद्दा | शक्तीची व्याप्ती | कार्यक्षेत्र |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| १ | सौ. शिल्पा चंद्रशेखर नाईक | सचिव | वसुली अधिकारी | सिंधुदुर्ग जिल्हा |

**अटी व शर्ती** .—

(१) वसुली अधिकारी यांनी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम १५६ व नियम, १९६१ चे नियम १०७ मधील तरतुदींनुसार कर्ज वसुलीची कार्यवाही करावी. कर्ज वसुली करताना सहकार कायदा, नियम यातील तरतुदी व परिपत्रकीय सूचनांचे पालन न केल्याचे निदर्शनास आल्यास प्रदान करण्यात आलेले अधिकार तात्काळ काढून घेण्यात येतील.

(२) सदरचे अधिकार सहकार कायदा कलम १०१ व ९८ अन्वये प्राप्त वसुली दाखल्याची अंमलबजावणी करण्याकरिता प्रदान केलेले आहे.

(३) वसुली अधिकारी यांनी दरमहा संदर्भ क्रमांक ४ मध्ये सूचना देण्यात आल्याप्रमाणे विहित नमुन्यात " अ-३ ", " अ-४", व " ब " कर्ज वसुलीची माहिती जिल्हा उप निबंधक, सहकारी संस्था, सिंधुदुर्ग यांचे कार्यालयास सादर करावी.

(४) अधिकार प्रदान केलेल्या वसुली अधिकारी असलेल्या व्यक्तीची बदली झाल्यास किंवा सेवानिवृत्ती झाल्यास किंवा सेवेतून काढून टाकल्यास किंवा त्याचा मृत्यू झाल्यास, अशा अधिका-यास प्रदान केलेले आधिकार आपोआप रद्द होतील.

(५) मा. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडील आदेश दिनांक ६ एप्रिल २०१८ नुसार वसुली अधिकारी यांना हुकुमनामा/वसुली दाखला मधील वसुलपात्र रक्कम व सदर आदेशात नमूद हुकुमनाम्याच्या/वसुली दाखल्याच्या आदेशिकेचा खर्च (Cost of Process) या व्यतिरिक्त इतर कोणतीही रक्कम वसुली खर्च म्हणून थकबाकीदारांकडून वसूल करता येणार नाही.

(६) लिलावाद्वारे मालमत्ता विक्री केल्यानंतर १.५० % दरानेच आदेशिकेचा खर्च वसूल करता येईल अन्यथा उपरोक्त नमूद ज्या टप्प्यावर थकबाकी रक्कम पूर्ण वसूल होईल त्या टप्पेनिहाय दरानेच असा खर्च वसूल करावा.

(७) उक्त नमूद आदेशाप्रमाणे खर्चाचे दराची आकारणी व वसुली बँकेस एका कर्जदाराकडून जास्तीत जास्त रक्कम रुपये १.५० लाख मर्यादेतच आदेशिकेचा खर्च म्हणून रक्कम वसूल करता येईल.

(८) उपरोक्त अट क्र. ६ व ७ मध्ये नमूद केलेल्या रकमेव्यतिरिक्त वसुली अधिकारी यांनी जादा रक्कम वसूल केल्याचे निदर्शनास आलेस ते महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० व नियम १९६१ मधील तरतुदीनुसार कारवाईस पात्र राहतील.

(९) प्रस्तुत खर्चाचा वापर वसूली अधिकारी/संस्था यांनी वसुली दाखल्यांची अंमलबजावणी करताना नोटीस फी, पोस्टेज, स्टेशनरी जाहिरात खर्च व प्रवास खर्च यासाठीच करावयाचा आहे. या व्यतिरिक्त इतर कोणत्याही कारणासाठी खर्च करता येणार नाही.

(१०) संस्थेने याप्रमाणे वसूल केलेल्या खर्चाबाबत व त्याच्या विनियोगाबाबत प्रकरणनिहाय हिशोब ठेवणे बंधनकारक राहील. सदरचा हिशोब संस्थेच्या नियुक्त वैधानिक लेखापरीक्षकांना लेखापरीक्षण सुरू असताना पडताळणीसाठी/तपासणीसाठी सादर करणे बंधनकारक राहील.

(११) "मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी रिट याचिका क्रमांक १९४२/२०१३" दि बेसीन कॅथॉलिक को-ऑप बँक विरुद्ध महाराष्ट्र राज्य व इतर या याचिकेमध्ये दिनांक ५ डिसेंबर २०१५ रोजी दिलेला आदेश विचारात घेऊन वसुलीची कार्यवाही करताना महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० व नियम १९६१ अन्वये प्राप्त असलेल्या अधिकारानुसारच वसुलीची कार्यवाही करावी.

(१२) वसुली अधिकारी यांनी नमूद केलेल्या कालावधीत वसुलीचे कामकाज समाधानकारक केले नसल्याचे निदर्शनास आल्यास किंवा प्रदान केलेल्या अधिकाराचा गैरवापर करीत असल्याचे निदर्शनास आल्यास, प्रदान केलेले अधिकार काढून घेतले जातील व भविष्यात असे कोणतेही अधिकार अशा व्यक्तीस प्रदान करण्यात येणार नाहीत.

(१३) शासन निर्णय क्रमांक संकीर्ण. १५०४/प्र.क्र.२३१/१५-स, दिनांक २३ नोव्हेंबर २००६ अन्वये वसुली अधिका-यांना तीन सिंहाच्या राजमुद्रेचा वापर करता येणार नाही.

(१४) वसुली अधिका-यास त्याच्या नावापुढे कोठेही " महाराष्ट्र शासन नियुक्त " आणि किंवा " सिव्हील कोर्ट ", "एक्झीक्युटीव्ह कोर्ट " या शब्दांचा अथवा तत्सम शब्दांचा वापर करता येणार नाही. त्या ऐवजी वसुली अधिकारी यांनी त्यांच्या नावापुढे " वसुली अधिकारी (महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम १५६ (१) व नियम १०७ अन्वये)" असे लिहावे.

(१५) वसुली अधिका-यास वसुलीसाठी वापर करण्यात येणा-या वाहनावर वसुली अधिकारी, "प्रमिला शिवराम जाधव सहकारी पतसंस्था मर्यादित, कडावल " असा फलक लावता येऊ शकेल.

(१६) वसुली अधिका-यांनी पगार जप्तीची कार्यवाही करताना कर्जदाराच्या/जामीनदाराच्या पगार कपातीबाबत राष्ट्रीयीकृत बँका वा अन्य बँका यांचेकडे परस्पर वेतन कपातीचा आदेश देऊन परस्पर पगार कपात करता येणार नाही. संबंधित कर्जदार/जामीनदार ज्या आस्थापनेवर काम करीत आहे त्या आस्थापनेवरील आहरण व संवितरण अधिकारी/पगार करणारा अधिकारी यांचेमार्फत पगारातून कर्ज वसूल करण्याची कार्यवाही करावी.

(१७) मा. सहकार आयुक्त कार्यालयाकडील परिपत्रक दिनांक १ जानेवारी २०१७ व दिनांक ३१ ऑक्टोबर २०१८ मधील दिलेल्या सूचनांचे वसुली अधिका-याने पालन करावे.

सिंधुदुर्ग,
दिनांक ८ मे २०२०.

**माणिक बी. सांगळे,**
जिल्हा उप निबंधक,
सहकारी संस्था, सिंधुदुर्ग.

---

**जिल्हा दुग्ध व्यवसाय विकास अधिकारी, रायगड-अलिबाग यांजकडून**

**वाचले :** (१) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम १०२.

(२) या कार्यालयाकडील पत्र क्र. जिदुविअ/शाखा-क/मच्छि. सं./प्रा.म.या./३९७/सन १९, दिनांक ७ डिसेंबर २०१९.

**मध्यंतरीय आदेश**

क्रमांक जिदुविअ/शाखा-क/मध्यं. आदेश/क. १०२/११७/सन २०२०.—महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम १०२ अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारापरत्वे मी, निलेश शिंदे, सहायक निबंधक, सहकारी संस्था (दुग्ध), रायगड-अलिबाग आदेश देतो की, गोल्डन कुक्कुटपालन सहकारी संस्था मर्या., मु. पो. शेणवई, ता. रोहा, जि. रायगड. नोंदणी क्रमांक आरजीडी/आरएचए/अेजीआर(ओ)/९०१/८६-८७, दिनांक २१ मे १९८७ अन्वये नोंदविण्यात आलेल्या संस्थेचा व्यवहार गुंडाळण्यात यावा. व याच अधिनियमातील कलम १०३ (१) अन्वये संस्थेकरिता अवसायक म्हणून श्री. बी. बी. वेल्हाळ, उप लेखापरिक्षक, सहकारी संस्था (दुग्ध), रायगड-अलिबाग यांची नेमणूक करीत आहे. उपरोक्त संस्थेच्या पदाधिका-यांनी ज्या मालमत्तेवर, वस्तूवर आणि दाव्यायोग्य हक्कावर संस्थेचा अधिकार आहे असे अगर तिचा अधिकार आहे असे आढळून येईल अशी सर्व मालमत्ता व वस्तू आणि दाव्यायोग्य हक्क तसेच संस्थेच्या व्यवहारासंबंधिची कागदपत्रे, दस्तऐवज, पुस्तके याचा ताबा अवसायक यांचेकडे तात्काळ स्वाधीन करावा.

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम १०२ चे पोट-कलम २ मधील तरतुदीनुसार सदर संस्थेला हा आदेश कायम का करू नये ? याबाबत त्यांचे लेखी म्हणणे या आदेशाचे तारखेपासून एक महिन्याचे आंत सादर करणेबाबत या आदेशाद्वारे कळविण्यांत येत आहे. वरील मुदतीत खुलासा न आल्यास अथवा दिलेला खुलासा समाधानकारक न वाटल्यास अंतिम आदेश देण्याबाबत कार्यवाही करण्यात येऊन हा आदेश कायम करणेत येत आहे.

हा आदेश मी माझ्या सही शिक्क्यानिशी दिला आहे.

**निलेश शिंदे,**
सहायक निबंधक,
सहकारी संस्था (दुग्ध), रायगड-अलिबाग.

अलिबाग,
दिनांक २० मार्च २०२०.

**जिल्हा दुग्ध व्यवसाय विकास अधिकारी, रायगड-अलिबाग यांजकडून**

**वाचले :** (१) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम १०२.

(२) या कार्यालयाकडील पत्र क्र. जिदुविअ/शाखा-क/का.क. ७७-अे/नोटीस/४०७/सन १९, दिनांक ३१ डिसेंबर २०१९ ने दिलेली नोटीस.

**मध्यंतरीय आदेश**

क्रमांक जिदुविअ/शाखा-क/मध्यं. आदेश/क. १०२/१०२/सन २०२०.—महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम १०२ अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारापरत्वे मी, निलेश शिंदे, सहायक निबंधक, सहकारी संस्था (दुग्ध), रायगड-अलिबाग आदेश देतो की, टॉपस्टेप शेळीमेंढी पालन सहकारी संस्था मर्या., मु. पो. शेणवई, ता. रोहा, जि. रायगड नोंदणी क्रमांक आरजीडी/आरएचए/अेजीआर(ओ)/३०४/(डी)/९५-९६, दिनांक ४ मे १९९५ अन्वये नोंदविण्यात आलेल्या संस्थेचा व्यवहार गुंडाळण्यात यावा. व याच अधिनियमातील कलम १०३ (१) अन्वये संस्थेकरिता अवसायक म्हणून श्री. बी. बी. वेल्हाळ, उप लेखापरिक्षक, सहकारी संस्था (दुग्ध), रायगड-अलिबाग यांची नेमणूक करीत आहे. उपरोक्त संस्थेच्या पदाधिका-यांनी ज्या मालमत्तेवर, वस्तूवर आणि दाव्यायोग्य हक्कावर संस्थेचा अधिकार आहे असे अगर तिचा अधिकार आहे असे आढळून येईल अशी सर्व मालमत्ता व वस्तू आणि दाव्यायोग्य हक्क तसेच संस्थेच्या व्यवहारासंबंधिची कागदपत्रे, दस्तऐवज, पुस्तके याचा ताबा अवसायक यांचेकडे तात्काळ स्वाधीन करावा.

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम १०२ चे पोट-कलम २ मधील तरतुदीनुसार सदर संस्थेला हा आदेश कायम का करू नये ? याबाबत त्यांचे लेखी म्हणणे या आदेशाचे तारखेपासून एक महिन्याचे आंत सादर करणेबाबत या आदेशाद्वारे कळविण्यांत येत आहे. वरील मुदतीत खुलासा न आल्यास अथवा दिलेला खुलासा समाधानकारक न वाटल्यास अंतिम आदेश देण्याबाबत कार्यवाही करण्यात येऊन हा आदेश कायम करणेत येत आहे.

हा आदेश मी माझ्या सही शिक्क्यानिशी दिला आहे.

**निलेश शिंदे,**
सहायक निबंधक,
सहकारी संस्था (दुग्ध), रायगड-अलिबाग.

अलिबाग,
दिनांक १३ मार्च २०२०.

**जिल्हा उप निबंधक, सहकारी संस्था, रत्नागिरी यांजकडून**

**वाचले** .—(१) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० (सुधारणा) २०१३ चे कलम १०२ (२) व कलम १०३(१).

(२) या कार्यालयाचा जा. पत्र क्र. जिउनिर/प्रशासन/स्वयंदिप मागासवर्गीय टेक्सटाईल को-ऑप./अवसायन/अंत. आदेश/१८५३/२०२०, दिनांक १९ जून २०२० चा अंतरीम आदेश.

**अंतिम आदेश**

क्रमांक जिउनिर/प्रशासन/अवसायन/स्वयंदीप मागासवर्गीय टेक्स/अंतिम आदेश/सन २०२०.—महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० (सुधारणा २०१३) चे कलम १०२(२) अन्वये मला प्रदान केलेल्या अधिकारानुसार मी, डॉ. अशोक गार्डी, जिल्हा उप निबंधक, सहकारी संस्था, रत्नागिरी या आदेशान्वये, स्वयंदिप मागासवर्गीय टेक्सटाईल को-ऑप. सोसा. लि., निवेंडी, ता. जि. रत्नागिरी या संस्थेचे कामकाज बंद करून व तिचा कारभार ऋणपरीशोधकाकडे सोपविणेबद्दलाचा दिनांक १९ जून २०२० रोजीचा मध्यंतरीय आदेश कायम करीत आहे.

उक्त संस्थेने ज्या मालमत्तेवर, वस्तुंवर व दावायोग्य हक्कांवर उक्त संस्थेचे अधिकार असतील किंवा आहे असे आढळून येईल ती मालमत्ता, वस्तू, कागदपत्रे तसेच संस्थेच्या व्यवहारातील पुस्तके, कागदपत्रे, दस्तऐवज, यांचा ताबा व नियंत्रण व इतर व्यवस्था अधिकार नियुक्त अवसायक यांच्या तात्काळ स्वाधिन करावयाचा आहे.

सदरचा आदेश मी माझे सही शिक्क्यानिशी आज दिनांक २४ जुलै २०२० रोजी दिला आहे.

**डॉ. अशोक गार्डी,**
जिल्हा उप निबंधक,
सहकारी संस्था, रत्नागिरी.

रत्नागिरी,
दिनांक २४ जुलै २०२०.

---

**सहायक निबंधक, सहकारी संस्था (पश्चिम उपनगरे) झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, मुंबई यांजकडून**

**अधिसूचना**

क्रमांक झोपुप्रा/निस/अ-१/SRA/CO/OW/१३४४७/सन २०२०.—सहायक निबंधक, सहकारी संस्था, (पश्चिम उपनगरे), झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, मुंबई, यांचेकडून मंजूर केलेल्या उपविधीची प्रत व नोंदणी प्रमाणपत्र, लष्करीया ग्रीन हाईट्स सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित, सी.टी.एस. नं. १ (पार्ट) आणि ६५१ (पार्ट) ऑफ व्हिलेज ओशिवरा, ता. अंधेरी, न्यु लिंक रोड, अंधेरी (प.), मुंबई ४०० १०२, ही संस्था महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० (सन १९६१ चा महाराष्ट्र नियम क्रमांक २४) कलम ९(१) अन्वये नोंदणी क्रमांक एम.यु.एम./एस.आर.ए./एच.एस.जी./टी.सी./१३०६२/सन २०२०, दिनांक ९ जुलै २०२० नुसार नोंदविण्यात आली व उक्त अधिनियमाच्या कलम १२(१) आणि महाराष्ट्र सहकारी संस्था, १९६१ चा नियम १०(१) अन्वये तिचे वर्गीकरण " गृहनिर्माण संस्था " असून उप वर्गीकरण " भाडेकरू सहभागीदारी संस्था " असे करण्यात आले आहे.

**संध्या बावनकुळे,**
सहायक निबंधक, सहकारी संस्था
(पश्चिम उपनगरे),
झो. पु. प्रा., मुंबई.

मुंबई,
दिनांक ९ जुलै २०२०.

---

**उप निबंधक, सहकारी संस्था, एल-विभाग, मुंबई यांजकडून**

**अधिसूचना**

क्रमांक एमयुएम-२/डब्ल्यू-एल/एचएसजी/टीसी/११०९३/२०२०-२०२१/सन २०२०/५५१.— उप निबंधक, सहकारी संस्था, एल-विभाग, मुंबई, याद्वारे अधिसूचित करीत आहे की, पलाझिओ को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी लि., सर्वे नं. ५०, सीटीएस नं. ८३२, व्हिलेज मोहिली, अंधेरी-कुर्ला रोड, कुर्ला (प.), मुंबई ४०० ०७२, ही संस्था महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० (सन १९६१ चा अधिनियम क्र. २४) यांच्या कलम ९(१) अन्वये उक्त अधिनियमांच्या कलम १२(१) आणि महाराष्ट्र सहकारी संस्था १९६१ चा नियम १०(१) अन्वये तिचे वर्गीकरण " गृहनिर्माण संस्था " असून उप वर्गीकरण " भाडेकरू सहभागिदारी गृहनिर्माण संस्था " असे करण्यांत आले आहे.

**शिरीष सपकाळ,**
उप निबंधक,
सहकारी संस्था, एल-विभाग,
मुंबई.

नवी मुंबई,
दिनांक २७ जुलै २०२०.

**जिल्हा उप निबंधक, सहकारी संस्था, सिंधुदुर्ग यांजकडून**

**अधिसूचना**

क्रमांक एसडीजी/एसडीआय/जीएनएल(ओ)/१२६/२०२०-२१/२०२०/१०३५.— क्रमांक एसडीजी/एसडीआय/जीएनएल(ओ)/१२६/२०२०-२१/२०२०, दिनांक १५ जून २०२० च्या प्रमाणपत्राद्वारे प्रमाणित करणेत येते की, श्रीया स्वयंरोजगार सहकारी संस्था मर्या., सिंधुदुर्ग, मु. पो. नानिवडे, ता. वैभववाडी, जि. सिंधुदुर्ग ही संस्था महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० (सन १९६१ चे महाराष्ट्र अधिनियम क्र. २४) मधील कलम ९(१) अन्वये नोंदण्यात आली आहे.

महाराष्ट्र सहकारी संस्था १९६१ मधील नियम क्रमांक १०(१) (७) अन्वये संस्थेचे वर्गीकरण " सर्वसाधारण संस्था " व उप वर्गीकरण " इतर संस्था " असे आहे.

**एम. बी. सांगळे,**

सिंधुदुर्ग, जिल्हा उप निबंधक,
दिनांक १५ जून २०२०. सहकारी संस्था, सिंधुदुर्ग.

**जिल्हा उप निबंधक, सहकारी संस्था, सिंधुदुर्ग यांजकडून**

**अधिसूचना**

क्रमांक एसडीजी/केडीएल/आरएसआर (सीआर)/१२२/२०२०/१०३९.—च्या प्रमाणपत्राद्वारे प्रमाणित करणेत येते की, सिंधुदुर्ग जिल्हा मागासवर्गीय विद्युत कर्मचारी सहकारी पतसंस्था मर्या., सिंधुदुर्ग, ही संस्था महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० (सन १९६१ चे महाराष्ट्र अधिनियम क्र. २४) मधील कलम ९(१) अन्वये नोंदण्यात आली आहे.

महाराष्ट्र सहकारी संस्था १९६१ मधील नियम क्रमांक १०(१) (८) (अ) अन्वये संस्थेचे वर्गीकरण " साधन संपत्ती संस्था " व उप वर्गीकरण " कर्ज देणा-या साधन संपत्ती संस्था " असे आहे.

**एम. बी. सांगळे,**

सिंधुदुर्ग, जिल्हा उप निबंधक,
दिनांक १५ जून २०२०. सहकारी संस्था, सिंधुदुर्ग.

**जिल्हा उप निबंधक, सहकारी संस्था, सिंधुदुर्ग यांजकडून**

**अधिसूचना**

क्रमांक एसडीजी/एसडीआय/जीएनएल (ओ)/१२७/२०२०-२०२१/२०२०/१०२९.— क्रमांक एसडीजी/एसडीआय/जीएनएल (ओ)/१२७/२०२०. २१/२०२०, दिनांक १५ जून २०२० च्या प्रमाणपत्राद्वारे प्रमाणित करणेत येते की, सिंधुवैभव कृषि बहुउद्देशीय सहकारी संस्था मर्या., सिंधुदुर्ग, मु. पो. ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग ही संस्था महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० (सन १९६१ चे महाराष्ट्र अधिनियम क्र. २४) मधील कलम ९(१) अन्वये नोंदण्यात आली आहे.

महाराष्ट्र सहकारी संस्था १९६१ मधील नियम क्रमांक १०(१) (७) अन्वये संस्थेचे वर्गीकरण " सर्वसाधारण संस्था " व उप वर्गीकरण " इतर संस्था " असे आहे.

**एम. बी. सांगळे,**

सिंधुदुर्ग, जिल्हा उप निबंधक,
दिनांक १५ जून २०२०. सहकारी संस्था, सिंधुदुर्ग.

**सहायक निबंधक, सहकारी संस्था, कुडाळ यांजकडून**

**अधिसूचना**

क्रमांक सनिकु/अ/हर्ष १४९ गृह/नोंदणी/२०१९.— या प्रमाणपत्राद्वारे प्रमाणित करणेत येते की, हर्ष आनंदवन सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या., पिंगुळी, ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग संस्था नोंदणी क्र. एसडीजी/केडिएल/एचएसजी/टीसी/५५१/२०२०, दिनांक ३ मार्च २०२० ने महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० (सन १९६१ चे महाराष्ट्र अधिनियम क्र. २४) मधील कलम ९(१) अन्वये नोंदण्यात आली आहे.

उपनिर्दिष्ट अधिनियम क्रमांक कलम १२(१) अन्वये व महाराष्ट्र संस्था नियम १०(१) ५(ब) अन्वये संस्थेचे वर्गीकरण " गृहनिर्माण संस्था " व उप वर्गीकरण " भाडेकरू सहभागीदारी गृहनिर्माण संस्था " असे आहे.

**के. आर. धुळप,**

सिंधुदुर्ग, सहायक निबंधक,
दिनांक ३ मार्च २०२०. सहकारी संस्था, कुडाळ.

**सहायक निबंधक, सहकारी संस्था, कुडाळ यांजकडून**

**अधिसूचना**

क्रमांक सनिकु/अ/उल्हास गृह १८७ /नोंदणी/२०१९.— या प्रमाणपत्राद्वारे प्रमाणित करणेत येते की, उल्हास आनंदवन सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या., पिंगुळी, ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग संस्था नोंदणी क्र. एसडीजी/केडीएल/एचएसजी/टीसी/५५०/२०२०, दिनांक ३ मार्च २०२० ने महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० मधील (१९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. २४) कलम ९(१) अन्वये नोंदण्यात आलेली आहे.

उपनिर्दिष्ट अधिनियम क्रमांक कलम १२(१) अन्वये व महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १०(१) ५(ब) अन्वये संस्थेचे वर्गीकरण " गृहनिर्माण संस्था " असे असून उप वर्गीकरण " भाडेकरू सहभागीदारी गृहनिर्माण संस्था " असे आहे.

**के. आर. धुळप,**
सहायक निबंधक,
सहकारी संस्था, कुडाळ.

कुडाळ,
दिनांक ३ मार्च २०२०.

---

**सहायक निबंधक, सहकारी संस्था, कुडाळ यांजकडून**

**अधिसूचना**

क्रमांक सनिकु/अ/धैर्यशिल गृह/नोंदणी/१८५/२०१९.— या प्रमाणपत्राद्वारे प्रमाणित करण्यात येते की, धैर्यशिल प्राईड सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या. कुडाळ, ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग संस्था नोंदणी क्र. एसडीजी/केडीएल/एचएसजी/टीसी/५४९/२०२०, दिनांक ३ मार्च २०२० ने महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० मधील (१९६१ चे महाराष्ट्र अधिनियम क्र. २४) कलम ९(१) अन्वये नोंदण्यात आलेली आहे.

उपनिर्दिष्ट अधिनियम क्रमांक कलम १२(१) अन्वये व महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १०(१) ५(ब) अन्वये संस्थेचे वर्गीकरण " गृहनिर्माण संस्था " असे असून उप वर्गीकरण " भाडेकरू सहभागीदारी गृहनिर्माण संस्था " असे आहे.

**के. आर. धुळप,**
सहायक निबंधक,
सहकारी संस्था, कुडाळ.

कुडाळ,
दिनांक ३ मार्च २०२०.

---

**जिल्हा दुग्धव्यवसाय विकास अधिकारी, रायगड-अलिबाग यांजकडून**

**वाचले.**—(१) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम १०२.

(२) या कार्यालयाकडील मध्यंतरीय आदेश क्र. जा.क्र. जिदुविअ/ शाखा-क/मध्यंतरीय आदेश/ क. १०२/६२८/सन १९, दिनांक ४ डिसेंबर २०१८.

**अंतिम आदेश**

क्रमांक जिदुविअ/शाखा-क/अंतिम आदेश/क. १०२/११४/सन २०२०.—हनुमान दूध उत्पादक सहकारी संस्था मर्या., फाळकेवाडी, ता. महाड, जि. रायगड या संस्थेचा व्यवहार गुंडाळणेचा मध्यंतरीय आदेश हा आदेश निर्गमित झाल्याचे तारखेपासून कायम करीत आहे.

अवसायक म्हणून श्री. बी. बी. वेल्हाळ, उप लेखापरिक्षक, सहकारी संस्था (दुग्ध), रायगड-अलिबाग यांची नियुक्ती कायम करीत आहे.

हा आदेश माझ्या सहीशिक्क्यानिशी दिला आहे.

**निलेश शिंदे,**
सहायक निबंधक,
सहकारी संस्था (दुग्ध), रायगड-अलिबाग.

अलिबाग,
दिनांक २० मार्च २०२०.

---

**जिल्हा दुग्धव्यवसाय विकास अधिकारी, रायगड-अलिबाग यांजकडून**

**वाचले.**— (१) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम १०२.

(२) या कार्यालयाकडील मध्यंतरीय आदेश क्र. जा. क्र. जिदुविअ/ शाखा-क/मध्यंतरीय आदेश/क. १०२/३०४/सन १९, दिनांक ३० ऑगस्ट २०१९.

**अंतिम आदेश**

क्रमांक जिदुविअ/शाखा-क/अंतिम आदेश/क. १०२/११२/सन २०२०.—आई जरीमरी देवी मच्छिमार वि. का. सहकारी संस्था मर्या., मु. पो. ता. पनवेल, जि. रायगड या संस्थेचा व्यवहार गुंडाळणेचा मध्यंतरीय आदेश हा आदेश निर्गमित झाल्याचे तारखेपासून कायम करीत आहे.

अवसायक म्हणून श्री. आर. जी. गोसावी, लेखापरिक्षक श्रेणी-१, सहकारी संस्था (पदुम), उडते पथक, रायगड-अलिबाग यांची नियुक्ती कायम करीत आहे.

हा आदेश माझ्या सहीशिक्क्यानिशी दिला आहे

**निलेश शिंदे,**
सहायक निबंधक,
सहकारी संस्था (दुग्ध),
रायगड-अलिबाग.

अलिबाग,
दिनांक २० मार्च २०२०.

**जिल्हा दुग्धव्यवसाय विकास अधिकारी, रायगड-अलिबाग यांजकडून**

**वाचले :** (१) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम १०२.

(२) या कार्यालयाकडील मध्यंतरीय आदेश क्र. जा. क्र. जिदुविअ/शाखा-क/मध्यंतरीय आदेश/ क. १०२/५६०/सन १९, दिनांक १७ ऑक्टोबर २०१८.

**अंतिम आदेश**

जा. क्र. जिदुविअ/शाखा-क/अंतिम आदेश/क १०२/११६/सन २०२०.— श्री संगारी मच्छिमार सहकारी संस्था मर्यादित, धामणी, तालुका खालापूर, जिल्हा रायगड या संस्थेचा व्यवहार गुंडाळणेचा मध्यंतरीय आदेश हा आदेश निर्गमित झाल्याचे तारखेपासून कायम करीत आहे.

अवसायक म्हणून श्री. बी. बी. वेल्हाळ, उप लेखापरिक्षक, सहकारी संस्था (दुग्ध), रायगड-अलिबाग यांची नियुक्ती कायम करीत आहे.

हा आदेश माझ्या सहीशिक्क्यानिशी दिला आहे.

**निलेश शिंदे,**
सहायक निबंधक,
सहकारी संस्था (दुग्ध), रायगड-अलिबाग.

अलिबाग,
दिनांक २० मार्च २०२०.

---

**जिल्हा दुग्धव्यवसाय विकास अधिकारी, रायगड-अलिबाग यांजकडून**

**वाचले :** (१) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम १०२.

(२) या कार्यालयाकडील मध्यंतरीय आदेश क्र. जा. क्र. जिदुविअ/शाखा-क/मध्यंतरीय आदेश/ क. १०२/६२७/सन १९, दिनांक ४ डिसेंबर २०१८.

**अंतिम आदेश**

जा. क्र. जिदुविअ/शाखा-क/अंतिम आदेश/क १०२/११५/ सन २०२०.— विजय मच्छिमार सहकारी संस्था मर्यादित रहाटाड, तालुका तळा, जिल्हा रायगड या संस्थेचा व्यवहार गुंडाळणेचा मध्यंतरीय आदेश हा आदेश निर्गमित झाल्याचे तारखेपासून कायम करीत आहे.

अवसायक म्हणून श्री. मा. ज. भाटकर, सहकार अधिकारी श्रे. २ यांची नियुक्ती कायम करीत आहे.

हा आदेश माझ्या सहीशिक्क्यानिशी दिला आहे.

**निलेश शिंदे,**
सहायक निबंधक,
सहकारी संस्था (दुग्ध), रायगड-अलिबाग.

अलिबाग,
दिनांक २० मार्च २०२०.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.